। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २०० वा । शनिवार दिनांक १८ ऑक्टोबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत महेश वय २० वर्षे, रा. काळे कॉलनी डिग्गी रोड उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.१५.१०.२०२५ रोजी उमरगा शहरातील डिग्गी रोड चौकातील जंजीरा चायनीज सेंटर समोर हैद्राबाद कडे जाणारे राष्ट्रीय महामार्ग क्र ६५ रोडवर लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे लोखंडी मुठ असलेली पातळ पात्याची तलवार असलेला गावठी कट्ट अंदाजे १०० किंमतीची विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला उमरगा पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने जप्त करुन फिर्यादी नामे-योगेश नामदेव सुर्यवंशी, पोलीस अंमलदार नेमणुक पोलीस ठाणे उमरगा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं. कलम २२३, सह शस्त्र कायदा कलम- ४, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये उमरगा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत ओमकार रा.बोर्डा ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.१६.१०.२०२५ रोजी आपल्या ताब्यातील टमटम क्र एमएच १२ एलटी ७८९३ हा कळंब शहरातील होळकर चौक ते तांदुळवाडी जाणारे रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना कळंब पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये कळंब पो. ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### गर्भपात करणाऱ्या डॉक्टरवर गुन्हा दाखल

भुम (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसासकडून समजलेली माहिती अशी की, डॉक्टर, रा. चिंचपुर ढगे ता. भुम जि. धाराशिव ह.मु. दत्तनगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर यांनी चिंचपुर ढगे डॉक्टर यांचे शेतात फिर्यादी सविता रा. विजोरा ता. वाशी जि. धाराशिव यांना नमुद डॉक्टरांनी गाडीत झोपवून गाडीत असलेल्या मशिनने तपासुन फिर्यादी या पाच महिन्याची गर्भवती असताना देखील गोळी खाण्यास दिली. ती गोळी फिर्यादी यांनी खाल्ल्याने त्यांचे पोटात दुखून मुलाचा गर्भपात झाला. फिर्यादीचे पतीने सदरचा अर्भक हा डॉक्टर यांचे शेतात पुरल्याने ते शेतात का पुरले असे म्हणून मारहाण केली.

अशा मजकुराच्या फिर्यादी सविता यांनी दि.१५.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे भुम येथे भा.न्या. सं.कलम ८९, २३८, ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## सप्टेंबरमधील नुकसानीचे २९२ कोटी मंजूर आजवर ४८१ कोटी प्राप्त

### मदतीचा तिसरा टप्पा अद्याप बाकी-आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- जिल्ह्यात अतिवृष्टी आणि महापुरामुळे अभुतपूर्व नुकसान झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर आपल्या महायुती सरकारने जुलै-ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीपोटी १८९ कोटी यापूर्वीच उपलब्ध करून दिले आहेत. त्याचे वितरणही युद्धपातळीवर सुरू आहे. गुरुवारी दुसऱ्या टप्प्यातील २९२ कोटी रुपयांच्या मंजुरीचा शासन आदेशही निघाला आहे. ही रक्कमही बाधित शेतकरी बांधवांच्या खात्यात तातडीने वितरित करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. खरवडून गेलेल्या जमिनीसाठी ४० कोटी रुपयांचा शासन आदेश आज निर्गमित होणे अपेक्षित आहे. याव्यतिरिक्त दोन हेक्टरपेक्षा अधिक तीन हेक्टर पर्यंत ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना दिवाळीनंतर तिसऱ्या टप्प्यातील अनुदान मिळणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीपोटी आपल्या महायुती सरकारने १८९ कोटी रुपये उपलब्ध करून दिले आहेत. त्याचे वितरणही सुरू आहे. अद्यापही काही ठिकाणी ही रक्कम प्राप्त झाली नसल्याच्या तक्रारी आपल्यापर्यंत येत आहेत. मात्र जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी अस्वस्थ होऊ नये आणखी वितरण प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे लवकरच रक्कम आपल्या थेट खात्यात जमा होणार आहे. या पहिल्या मदतीच्या टप्प्यापाठोपाठ सप्टेंबर महिन्यात झालेल्या नुकसानीपोटी दुसरा टप्प्यातील मदतीचे वितरणही आता लवकरच सुरू होईल. त्यासाठी गुरुवारी २९२ कोटी ४९ लाख २१ हजार ४६० रुपयांच्या मदतीचा शासन निर्णय निघाला आहे. जिल्ह्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे तीन लाख ११ हजार २९१ हेक्टर २३ आर एवढे क्षेत्र बाधित झाले आहे. त्यामुळे चार लाख चार हजार ६५६ शेतकरी बांधवांना त्याचा फटका बसला आहे. त्यांना या नैसर्गिक संकटाच्या जोखडात बाहेर काढण्यासाठी २९२ कोटी ४९ लाख २१ हजार ४६० रुपयांच्या मदतीचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून १३ ऑक्टोबर रोजी विभागीय आयुक्तांना सादर करण्यात आला होता. तातडीने या सगळ्या बाबींचा पाठपुरावा करून काल १६ ऑक्टोबर रोजी म्हणजे तीन दिवसात आपण शासन आदेश काढून २९२ कोटी रुपयांच्या मदतीचा दुसरा टप्पा मंजूर करवून घेतला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

विभागीय आयुक्तांना सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात जिल्ह्यात महापुरामुळे शेतजमीन खरवडून जाणे, जमीन खचणे, नदीपात्रातील जमीन वाहून जाणे आणि गाळ साचणे हे सगळे नुकसान भरून काढण्यासाठी ४० कोटी ४८ लाख दोन हजार ३५० रुपयांचा निधी अपेक्षित असल्याचे जिल्हा प्रशासनाने नमूद केले आहे. जिल्ह्यातील ३३ हजार २६३ शेतकरी बांधवांचे आठ हजार ७७४ हेक्टर ४५ आर एवढ्या क्षेत्राला फटका बसला आहे. त्यासाठी आपल्या महायुती सरकारने जाहीर केल्याप्रमाणे ( खरडून गेलेल्या जमिनीसाठी रु.४७ हजार हेक्टर प्रमाणे व जमिनीत वाळूचा,गाळाचा ३ इंच थर जमा झाला असेल त्यासाठी रु.१८००० प्रति हेक्टर ) ४० कोटी ४८ लाख दोन हजार ३५० रुपयांच्या अनुदान मंजुरीचा शासन निर्णय आज अपेक्षित आहे. त्याव्यतिरिक्त रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून या सगळ्या जमिनी पूर्ववत करण्यासाठी प्रति हेक्टर तीन लाख रुपये याप्रमाणे साधारणतः २७० कोटी रुपये आपल्या जिल्ह्यासाठी उपलब्ध होणार आहेत. आपण यापूर्वीच ७५० कोटी रुपयांपेक्षा अधिकची मदत आपल्या जिल्ह्यासाठी आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब उपलब्ध करुन देणार असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यात १८९ कोटी, गुरुवारी मंजूर झालेले २९२ कोटी आज अपेक्षित असलेल्या शासन निर्णयानुसार ४० कोटी आणि रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून सुमारे २७० कोटी रुपये मिळणार आहेत. तसेच दोन हेक्टरपेक्षा अधिक नुकसान झालेल्या तीन हेक्टर क्षेत्रापर्यंतचे अनुदानही दिवाळीनंतर मिळणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

## पूरग्रस्तांसाठी वैद्यकीय महाविद्यालयाचा मदतीचा हात – आरओ यंत्रांच्या माध्यमातून दिलासा

धाराशिव (जिमाका): जिल्ह्यातील अलीकडील पूरपरिस्थितीने अनेक कुटुंबांचे आयुष्य विस्कळीत झाले. घरं,संसार, शेती या सगळ्याच गोष्टी पाण्यात वाहून गेल्या.पण या अंधाऱ्या क्षणी आशेचा एक किरण ठरला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव यांचा संवेदनशील उपक्रम.

समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखत महाविद्यालयातील अधिकारी,डॉक्टर,परिचारिका, कर्मचारी वर्ग यांनी एकत्र येऊन पूरग्रस्त भागातील नागरिकांसाठी आरओ वॉटर फिल्टर यंत्र भेट दिली. पाण्याचे संसर्गजन्य आजार टाळण्यासाठी व नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे,हा या उपक्रमामागचा खरा हेतू.

या कार्यामागे महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चव्हाण व वैद्यकीय अधीक्षक डॉ.तानाजी लाकाळ यांचे मार्गदर्शन लाभले. अध्यापक,वैद्यकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांनी आपल्या वेतनातून स्वेच्छेने निधी जमा करून ही मदत केली.पूराच्या पाण्याने घरं उध्वस्त झाली,पण माणुसकीचा झरा कोरडा पडला नाही हे या उपक्रमाने दाखवून दिले आहे.

धाराशिव वैद्यकीय महाविद्यालयाने दिलेला हा 'आरोग्यदायी' हात म्हणजे केवळ मदत नव्हे,तर समाजातील संवेदनेचा साक्षात धडा आहे. सामाजिक बांधिलकी जपत मानवीतेचा संदेश देणारा हा उपक्रम आज सर्वत्र कौतुकास पात्र ठरत आहे.

## लोकनाट्य कलावंतावर उपासमारीची वेळ धाराशिव जिल्ह्यातील सात कला केंद्राचे परवाने रद्द: ७०० कुटुंबाचे भवितव्य धोक्यात!

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव तालुका आणि जिल्ह्यात अनेक वर्षापासून लोकनाट्य कलाकेंद्र चालविले जात होते. अशा केंद्रामधून ग्रामीण भागातील शेकडो कलावंतांना रोजगार मिळत होता. पारंपारिक लोक कलेच्या जतन करण्यात अशा कलावंताची मोठी भूमिका बजावली जात आहे. मात्र दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी पारगाव कला केंद्रावर घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सात लोकनाट्य कला केंद्राची नियमाचे उल्लंघन होत असल्याचे कारणे देत त्यांच्यावर कारवाई केली. या प्रकरणात धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयाने भारतीय दंड संहिता कलम २२३ अंतर्गत गुन्हा दाखल झालेल्या केंद्राचे परवाने रद्द करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे यानुसार १५ ऑगस्ट २०२५ रोजी तुळजाई कला केंद्र पारगाव, पिंजरा कला केंद्र आळणी फाटा, तसेच साई कला केंद्र आळणी फाटा या लोकनाट्य कला केंद्राची परवाने रद्द करण्याचा आदेश पारित करण्यात आला. तरी या केंद्रामधील सुमारे ३५० महिला नर्तिका व आणि ५० पुरुष कलावंत तसेच त्यांच्या कुटुंबीयांसह एकूण ६०० ते ७०० व्यक्तींवर उपासमारीची वेळ आली आहे, कलावंताचे म्हणणे आहे की, एक घटनेचा आधारे सर्व कला केंद्रांना दोषी ठरवणे हा सरसकट अन्याय आहे आम्ही अनेक वर्ष नियम पाळुन आपले कला केंद्र चालवत आहोत, शासनाने आणि जिल्हाधिकारी यांनी नाण्याच्या दोन्ही बाजू तपासाव्यात आणि निष्पाप कलावंतवर सध्या होणारा अन्याय दूर करावा. लोकनाट्य ही धाराशिव जिल्ह्याची सांस्कृतिक ओळख आणि ग्रामीण कलेचे हृदय आहे. शासनाने संवेदनशील पणे या प्रश्नाकडे पाहून या कलावंताचे रोजगार टिकवून ठेवण्यासाठी आणि पारंपरिक लोककलेचे अस्तित्व जपण्यासाठी योग्य तो मार्ग काढावा अशी सर्व कलावंताची एकमुखी मागणी आहे. कलावंतांना आशा आहे की शासन आपल्यावर अन्याय करणार नाही व हा ७०० ते ८०० कुटुंबाचा प्रश्न सोडऊन न्याय मिळावा अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

### तुळजाभवानी देवीचे प्रमुख द्वाराजवळून ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे लॉकेटची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी धनंजय बाळासाहेब हिप्परकर, वय ४९ वर्षे, रा. खाडगाव रोड लातुर हे दि. २१.०९.२०२५ रोजी श्री. तुळजाभवानी देवीचे प्रमुख द्वाराजवळ तुळजापूर असताना त्यांचे गळ्यातील ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे लॉकेट अंदाजे १,७५,००० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले.

अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- धनंजय हिप्परकर यांनी दि.१६. १०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत. गर्दीचा फायदा घेऊन चोर चोरी करतात सावधगीरी बाळगणे आवश्यक आहे.

## नारंगवाडीत अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास प्रारंभ

नारंगवाडी (प्रतिनिधी)- उमरगा तालुक्यातील नारंगवाडी येथे हरिनामातच परमेश्वराचा निवास असतो या भावनेने अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सुरुवात भक्तिभावाने झाली आहे. उज्वलानंद महाराज यांच्या कृपाशिर्वादाने तसेच शाहुराज गाडे महाराज, वैजीनाथ सूर्यवंशी महाराज व राम गायकवाड यांच्या आश्रयाखाली हा सोहळा पार पडत आहे.

या सप्ताहाचा शुभारंभ गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी झाला असून समारोप बुधवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी होणार आहे. दररोज पहाटे ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ तसेच रात्री कीर्तन व हरिजागर अशा विविध भक्तिमय कार्यक्रमांनी वाडीतील वातावरण मंगलमय झाले आहे.

सुरेखा सूर्यवंशी महाराज, कमलाकर पाटील महाराज, भास्कर महाराज, बुद्धीचंत बिराजदार महाराज, व्यंकट पवार महाराज व शिवाजी कदम महाराज आदी प्रवचनकार भाविकांना अध्यात्मिक विचारांचा वर्षाव करणार आहेत. गायकणाचार्य व मृदंगाचार्यांच्या स्वरतालात हरिनामाचा गजर घुमत असून, गावकऱ्यांचा सहभाग उत्साहवर्धक आहे.

समारोप दिनी श्रीश्रीश्री परमहंस १००८ विश्वानंद सरस्वती (मदनसुरी) यांच्या हस्ते कलशारोहण, काल्याचे कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहाचे आयोजन लखन जाधव, सुभाष सूर्यवंशी, भालचंद्र भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, संपूर्ण नारंगवाडी ग्रामस्थ सहभागी होत आहेत.

## भाई फुलचंद गायकवाड पाटील यांची रिपब्लिकन सेना धाराशिव जिल्हा महासचिवपदी निवड!




धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशिव प्रतिनिधी-आंबेडकरी चळवळीतील निष्ठावंत, कार्यतत्पर आणि समाजकारणात सक्रिय असलेले आयु.भाई फुलचंद अंबादास गायकवाड पाटील (सिद्धार्थ नगर,धाराशिव,ता. जि.धाराशिव) यांची रिपब्लिकन सेना, धाराशिव जिल्हा महासचिव म्हणून निवड करण्यात आली आहे. ही नियुक्ती सरसेनानी आदरणीय आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन सेनाच्या आदेशानुसार, धाराशिव जिल्हा प्रभारी आयु. कपिल सरोदे साहेब आणि जिल्हाप्रमुख अनिल हजारे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक.०५/१०२५ रो झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत एकमताने करण्यात निवड आली. या नियुक्तीनंतर आयु. गायकवाड पाटील यांनी सांगितले की, मी सरसेनानी आनंदराज आंबेडकर साहेबांचे विचार, तत्त्वे आणि चळवळ धाराशिव जिल्ह्याच्या प्रत्येक गावात पोहोचवण्याचा दृढ निश्चय केला आहे. रिपब्लिकन सेनेची संघटना अधिक जोमाने उभी करण्यासाठी मी सर्व कार्यकर्त्यांसह सातत्याने प्रयत्न करत राहीन. या नियुक्तीबद्दल सर्व आंबेडकरी बांधव, रिपब्लिकन सेनेचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी आयु. भाई फुलचंद गायकवाड पाटील यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक व संघटनात्मक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्री कुलस्वामिनी आश्रम शाळा जळकोट येथे पालक मेळावा संपन्न



जळकोट (विजय पिसे)-१६ ऑक्टोबर २०२५ वार गुरुवार रोजी श्री कुलस्वामिनी प्राथमिक, माध्यमिक आश्रम शाळा जळकोट व राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय जळकोट ता. तुळजापूर जि.धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आश्रम शाळेत पालक मेळावा आयोजित करण्यात आला.मेळाव्याचे अध्यक्ष महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोट संस्थेचे पदाधिकारी माजी नायब तहसीलदार माणिकराव चव्हाण साहेब ,प्रमुख पाहुणे रामतीर्थ नगरीचे सरपंच लक्ष्मण राठोड साहेब,संस्थेचे पदाधिकारी तथा जि. प. सदस्य प्रकाश चव्हाण साहेब अलियाबाद नगरीचे पोलीस पाटील शिवाजी चव्हाण, शंकर वाडीकर,शिवाजी राठोड,मोहन चव्हाण उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प्रथमता पालक प्रवेश करताना लेजीम गीतावर वर नृत्य सादर करुन व प्राचार्य संतोष चव्हाण साहेब व मुख्याध्यापिका आशा पवार मॅडम, नागेंद्र गुरव सर,खंडेराव कारले सर, सुरेश कोकाटे सर व इतर शिक्षक बांधवानी पुष्पगुछ देऊन सर्व पालकांचे स्वागत करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले व कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे,पालकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री नागेंद्र गुरव सर यांनी केले. सुरेश कोकाटे सरांनी आपले मनोगत व्यक्त केले.संस्थेचे पदाधिकारी प्रकाश चव्हाण साहेब यांनी बोलताना विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची सुख सुविधा कमी पडू देणार नाही व इयत्ता आठवीतील कुमारी रेखा दुधाजी जाधव या विद्यार्थिनीला संस्थेने दत्तक घेतले. व यापुढे प्रतिवर्षी एक विद्यार्थ्याला दत्तक घेण्याचे हमी घेतले व बारावी पर्यंत शैक्षणिक खर्चाचे जबाबदारी घेतले.शेवटी प्राचार्य संतोष चव्हाण साहेब यांनी पालकाचे प्रश्नाचे समाधानकारक उत्तर दिले.शाळेमध्ये राबवत असलेल्या विविध उपक्रमा बद्दल, व पुढे तीन महिने कोण कोणते उपक्रम राबवणार आहे या बद्दल माहिती सागितले आलेल्या सर्व पालकांचे आभार मानले व एकंदरीत विचारमेळाव्यात पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल विचार विनिमय करण्यात आला व पालक शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

या मेळाव्यात अनेक माता पालक व पालक उपस्थित होते.मेळाव्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन किरण कांबळे सर केले.उपस्थिताचे आभार प्रा. संतोष दुधभाते सरांनी मानले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भारताला सक्षम व्हावे लागेल

भारताची वरचेवर प्रगती पाहाता आता अमेरिकेचे डोळे फिरायाला लागले आहेत. पुर्वी पेक्षा भारत स्वयंपुर्ण होताना दिसून येत आहे. अनेक क्षेत्रात प्रगती साधली आहे. आंतराळातसुद्धा भरारी घेतली आहे. त्याच प्रमाणे संरक्षण क्षेत्रात आघाडी घेतली आहे. भारतीय बनावटीचे युद्धाची सामुग्री तयार केली जात आहे. विमानाबरोबर दूरवर मारा करणारे क्षेपणास्त्र तयार करीत आहेत. ऑपरेशन सिंदुर यशस्वी करून दाखविल्याने भारताची युद्धाबाबत शक्ती वाढली आहे हे जगाला दाखवुन दिले आहे. भारत हा वरचेवर सक्षम देश बनत आहे. हे मान्यच केले पाहिजे. आज अमेकरिका विनाकारण वाढीव टैरिफची घोषणा करीत नाही. यामागे धुर्त असा विचार आहे. जगात अमेरिकन वस्तूची बाजारपेठ भारत आहे. भारतावर अधिक कर लावुन आपल्याच देशात आर्थिक बळ मजबुत करण्याचा अमेरिकेचा विचार असावा. भारत हा कृषी प्रधान देश आहे. मोठ्या प्रमाणात अन्नधान्य पिकवितो आहे. त्यामुळे जनता सुखी-समाधानी आहे. इतर देशातील नागरिक समाधानी नाहीत ही अपेक बाबी पहिल्यांदा लक्षात येते. आपल्यादेशात धार्मिकता जोपासली जाते. आज देवाला घाबरणारी मंडळी आहे तसे ईतर देशात नाही. अमेरिका व चीन या देशातील नागरिक यंत्राप्रमाणे काम करताना दिसतात. त्यांना बाजारात खरेदी करण्यासाठी सार्वजनिक सुट्टी द्यावी लागते. तरच चीनी बनावटीचे वस्तू खरेदी करतात. भारतात तसे नाही. भारतीय आपल्या देशात उत्पादित होणाऱ्या मालाची खरेदी करतात. भारताने नुकतेच स्वावलंबन व स्वदेशी हा गुण स्विकारला आहे. वास्तविक यापुर्वीच हा गुण स्विकारणे अपेक्षित होते. भारतीय बनाटीचे उद्योगामध्ये बनविलेल्या वस्तूची जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे. आता कोठे भारताने काही वस्तू बनऊन निर्यात सुरू केली आहे. जो पर्यंत निर्यात मोठ्या प्रमाणात करणार नाही तो पर्यंत जागतिक स्तरावर प्राधान्य मिळणार नाही. जागतिक चलन मिळणार नाही. मोबाईलच्या क्षेत्रात आघाडी घेणे उचित आहे ती घेतली गेली आहे. भारताने भारतीय कुटीर व हस्तकलेस प्रोहत्सान देण्याची गरज आहे. कलाकुसर जगात केवळ भारतीयात रुजलेली कला आहे. याला वाटेल ते किंमत परदेशिय मोजातात. त्यामुळे भारतीय कलांना प्रोहत्सान दिले पाहिजे. आज ग्रामीण भागातील व्यवसायाकडे दुर्लक्ष होत आहे. वास्तविक राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी खरा भारत ग्रामीण भागात वसलेला आहे असे मत व्यक्त केले होते. खरा भारत संख्यात्मक ग्रामीण भागात अधिक आहे. ग्रामीण भागातून कृषीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. म्हणून सुख व समाधाचे वातावरण आहे. ग्रामीण भागात शेती हा एकमेव मोठा व्यवसाय आहे. शेतीकडे जर सरकारने लक्ष दिले तर निश्चित ग्रामीण भागाचा विकास होईल. आज मोठ्या शहरातील मंडळी ग्रामीण भागाकडे वळली आहे. मोठी शहरे ही आरोग्य बिघडविणारी ठरली आहेत. आज तसा विचार केला तर अनेक फळे हे परदेशात निर्यात केली जातात. आंबा, द्राक्षे, केळी असे बरेच भारतीय फळे निर्यात केली जातात. जागतिक बाजारपेठेत केवळ फळाचे नाही तर फुलाची मागणी मोठी आहे. जी अमेरिका तयार करू शकत नाही. भारतात तीन ऋतू आहेत तसे जगात नाहीत. भारतीयांनी मनावर घेतले व सरकारने मदत केली तर जगाच्या पाठीवर महासत्ताधिश देश लवकरच ओळखला जाऊ शकतो. एवढी क्षमता भारतीयांत आहे. जगात इतर देशापेक्षा अमेरिकेचे ट्रम्प यांचा डोळा भारतावर आहे. त्यामुळे सतत दबावतंत्र आवलंब करीत आहे. कितीही दबाब तंत्र आवलंबले तरी ते झुगारून लावण्याचे काम भारतीयांनी केले आहे. त्यामुळे भारताने पन्नासटक्के टैरिफ झुगारले आहे. काही झाले तरी अमेरिका दबाबतंत्र वापरत आहे, त्याला प्रतिसाद दिला जात नाही. आता तर रशियाकडून तेल भारत खरेदी करणार नाही असे मत व्यक्त केले. वास्तविक भारतात लोकशाही आहे. अशा भारतात देशाचे पंतप्रधान निर्णय घेतात, अमेरिका नाही. हे ट्रम्प यांनी ओळखुन घेतले पाहिजे. भारताला जेंव्हा वाटेल किंवा कोणाकडून तेल घ्यावे असे वाटत असेल त्यांच्याकडून तेल खरेदी करू शकतो. अमेरिका सांगणारा कोण? त्यामुळे ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा अमेरिकेचा कारभार हाती घेताच वाटेल तसे अप्रिय निर्णय घेत आहेत. हे केवळ जगाला पटत नाही तर खुद अमेरिकेला पटत नाही. त्यामुळ एस चेंबर ऑफ कॉमर्सने एच-१बी व्हिसा अर्जांवर १ लाख डॉलर्स शुल्क आकारण्याच्या डोनाल्ड ट्रम्प सरकारच्या निर्णयाविरुद्ध खटला दाखल केला असून, हे पाऊल इमिग्रेशन कायद्याचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. यूएस चेंबर ऑफ कॉमर्स ही जगातील सर्वात मोठी व्यावसायिक संस्था आहे. या संस्थेची स्थापना १६१५ मध्ये झाली आहे. यूएस चेंबर ऑफ कॉमर्सने दाखल केलेल्या खटल्यात असा युक्तिवाद केला आहे की, नवीन शुल्क इमिग्रेशन आणि राष्ट्रीयत्व कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादा ओलांडते. यूएस चेंबर ऑफ कॉमर्सचे कार्यकारी उपाध्यक्ष आणि मुख्य धोरण अधिकारी नील ब्रॅडली म्हणाले की, या शुल्कामुळे अनेक अमेरिकन कंपन्यांना, विशेषतः स्टार्टअप्स आणि लहान व्यवसायांना, कुशल परदेशी कामगारांना कामावर ठेवणे अशक्य होईल. अशा अनेक बाबीमुळे खुद अमेरिकेतील जनता नाराज आहे. वरचेवर खटले दाखल होण्याची शक्यता आहे. अमेरिकेचा वाढता दबाब पाहाता आता भारतीयांनी स्वावलंबन व स्वकृत्वाची चुणूक दाखविण्याची गरज आहे. मुळात भारतीयांनी स्वदेशी मालावर प्रेम केले पाहिजे. जो पर्यंत देशाचे ग्राहक बनणार नाही तो पर्यंत अमेरिका असो किंवा चीनचे वर्चस्व राहाणार आहे. या दोघांची मोठी बाजार पेठ हे भारत आहे. मोठा महसुल मिळतो आहे. त्यामुळे आता भारतीयांनी विचार करून आगामी वाटचाल करण्याची गरज आहे. ट्रम्प यांचे वरचेवर भारतावर दबाब चालूच आहे. विविध मार्गाने ते दबाब निर्माण करीत आहे. लबाड बोलण्यात पटाईत आहेत. त्यांनी भारत आणि पाकिस्तान दरम्यान ऑपरेशन सिंदूरनंतर उद्भवलेली युद्धजन्य स्थिती थांबविली असा लबाड दावा केला आहे. असे बालिश वक्तव्यामुळे भारतीय सावध असले पाहिजेत. भारताला सर्व बाबतीत सक्षम व्हावे लागणार आहे.

## धनत्रयोदशी आरोग्य, श्रद्धा आणि समृद्धीचा सुवर्ण सोहळा

दिवाळीचा भव्य उत्सव आणि आनंदाची अखंड यात्रा धनत्रयोदशीने (धनतेरस) सुरू होते. आश्विन वद्य त्रयोदशीचा हा मंगल दिवस केवळ कॅलेंडरवरील एक तारीख नाही, तर तो आशेचा पहिला दिवा, आरोग्याचा पहिला श्वास आणि संस्कृतीचा पहिला सूर आहे. भारतीय परंपरेत या दिवसाला असलेले सांस्कृतिक, धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व हे सिद्ध करते की, धनत्रयोदशी म्हणजे जीवनाच्या अंगणातला सुवर्णप्रभात आहे.

दिवाळीच्या उत्सवाची पहिली पहाट सुवर्णकणांनी झळाळलेली, मंगल प्रकाशात नहालेली तीच धनत्रयोदशी. हा दिवस म्हणजे आशेचा पहिला दिवा, आरोग्याचा पहिला श्वास आणि संस्कृतीचा पहिला सूर. धनत्रयोदशी म्हणजे जीवनाच्या अंगणात उमलणारा सुवर्णप्रभात, जिथे आत्म्याला नवा उजेड मिळतो आणि आरोग्य, श्रद्धा व समृद्धीचा एकत्रित दीप प्रज्वलित होतो.

समुद्रमंथनातून प्रकटलेला तो अमृताचा कलश घेऊन आलेले देव भगवान धन्वंतरी. त्यांच्या हातात शंख, चक्र, जळू आणि अमृतकलश म्हणजे जीवन, संरक्षण, उपचार आणि अमरलाभ यांचा संगम. तो देवत्वाला उपचाराची भाषा देतो आणि आरोग्याला अध्यात्माचे अधिष्ठान. धन्वंतरी म्हणजे आरोग्याचा देव आणि आयुष्याचा आरंभ. त्यांच्या तेजस्वी मूर्तीत आयुर्वेद, संतुलन आणि आयुष्याची गूढ रचना दडलेली आहे. या दिवशी धन्वंतरीची पूजा म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांच्या संतुलनाची प्रार्थना. फक्त औषधांचे पूजन नव्हे, तर मनःशांती, सात्त्विक आहार आणि विचारांच्या आरोग्याचे स्मरण हीच खऱ्या अर्थाने धनत्रयोदशीची पूजा आहे.

''धन म्हणजे फक्त पैसा नाही, ते आरोग्याचे सौंदर्य आहे.'' धनतेरसचा दिवा केवळ घर उजळत नाही, तो मनालाही आरोग्याचा प्रकाश देतो. शरीरात आरोग्य, मनात शांती आणि घरात समृद्धी हा तिन्ही प्रवाहांचा संगमच धनत्रयोदशीचा आत्मा आहे. आरोग्य आणि संपत्ती यांचा समतोल राखणे म्हणजे जीवनाच्या खऱ्या पूजा परंपरेची ओळख जपणे.

धनत्रयोदशीला सोनं, चांदी, भांडी, झाडू, लक्ष्मी-गणेश मूर्ती खरेदी करण्याची प्रथा आहे. पण ''धनत्रयोदशी म्हणजे सोन्याची खरेदी नव्हे, तर श्रद्धेचा सुवर्ण क्षण''. या प्रत्येक खरेदीमागे एक प्रतीकात्मकता दडलेली आहे. धन आणि समृद्धी संदर्भाने या दिवशी खरेदी केलेली वस्तू घरात समृद्धी घेऊन येते, अशी श्रद्धा आहे. पण खरे धन म्हणजे केवळ संपत्ती नव्हे, ती संस्कारांची संपन्नता आहे. झाडू खरेदी करणे म्हणजे घरातील अलक्ष्मी आणि नकारात्मकता दूर करणे. ही केवळ भौतिक धनाची पूजा नाही, तर मनाच्या स्वच्छतेचे पूजन आहे. ''भांडं नव्हे, ती भक्तीची पातेली आहे; सोनं नव्हे, ती आशेची रेघ आहे.''

भांडी खरेदी करून त्यात धणे भरून ठेवण्याची प्रथा म्हणजे धान्याच्या रूपाने घरात येणाऱ्या समृद्धीचे स्वागत करणे. व्यापारी वर्ग हा दिवस नव्या वर्षाची सुरुवात मानतो. तिजोरीचे पूजन करून, नव्या जमा-खर्चाच्या वह्यांवर हळद-कुंकू वाहून ते आर्थिक आचारसंहितेचा आरंभ करतात.

धनत्रयोदशी म्हणजे अंतःकरणातील अमृत शोधण्याचा दिवस. ''धन'' म्हणजे संपत्ती नव्हे, ती संस्कारांची संपन्नता आहे. लक्ष्मी, कुबेर आणि धन्वंतरी यांच्या पूजनातून जीवनात संतुलन आणण्याचा संदेश मिळतो. ज्याच्या हृदयात श्रद्धा आहे, त्याचे घर सदैव समृद्ध आहे. धनत्रयोदशी हा केवळ एक सण नाही, तो आरोग्य, श्रद्धा आणि समृद्धीचा सुवर्ण सोहळा आहे. ''धनत्रयोदशीच्या या दिव्य उजेडात, फक्त धन नव्हे, तर मनही उजळू दे.'' या दिवशी प्रज्वलित होणारा प्रत्येक दिवा आपल्याला आठवण करून देतो की, ''घरात सुवर्ण नसो, पण आरोग्याचा तेजोदीप सदैव प्रज्वलित राहो.'' तुमच्या आयुष्यात आरोग्याची श्रीमंती, श्रद्धेचा प्रकाश आणि समृद्धीचा सुवर्ण तेज नांदो! धनत्रयोदशीच्या हार्दिक शुभेच्छा!

''त्या रात्री सोन्याच्या प्रकाशाने मृत्यूचा अंधार हरवला.''

एका कथेनुसार, हेमा राजाच्या पुत्राला लग्नाच्या चौथ्या दिवशी अकाली मृत्यू येणार असतो. त्याचे आप्तेष्ठ आपल्या बुद्धिमत्तेने, घराच्या प्रवेशद्वारावर सोन्या-चांदीच्या मोहरा ठेवून आणि मोठमोठ्या दिव्यांनी महाल उजळवून ठेवते. रात्री सर्परूपात आलेल्या यमराजाचे डोळे सोन्याच्या प्रकाशाने दिपतात, त्यामुळे यम प्राण न घेता आपल्या जगात परततो आणि खऱ्या अर्थाने ''त्या रात्री सोन्याच्या प्रकाशाने मृत्यूचा अंधार हरवला.''

**राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**मोबाईल – ९८९०५७७१२८**

## आरोग्य चांगले राहण्यासाठी काय करावे



आहार

दैनंदिन जेवणात स्निग्ध पदार्थ, खनिज इत्यादी घटक तत्त्वांनी युक्त सकस व संतुलीत नियमित पुरेसा आणि ताजा आहार व्यक्तीला मिळाल्यास आरोग्य लाभते. आहारावर आरोग्य विषयक स्थिती अवलंबून असते.

स्वच्छता

व्यक्तीच्या खाण्यापिण्यामध्ये स्वच्छता, स्वच्छतेमुळे आरोग्याला पोषक स्थिती निर्माण होते. अस्वच्छतेमधून मलेरिया, गास्ट्रो इत्यादी सारखे रोग उदभवतात. वैयक्तिक व सार्वजनिक पातळीवर व्यक्तीने स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे. ज्यामुळे आरोग्य चांगले राहते.

करमणूक

मनोरंजनातून व्यक्तीला आनंद मिळतो. मानसिक स्वास्थ लाभते. जीवन सुखी समाधानी बनते. व्यक्ती जेव्हा उदासिन बनतो, तेव्हा तो मनोरंजनाचा आधार घेतो. सुयोग्य मनोरंजनामुळे व्यक्तीला शारीरिक, मानसिक स्वास्थ लाभते.

व्यायाम व विश्रांती

व्यायामामुळे व्यक्तीला आपला आरोग्यविषयक दर्जा उंचावता येतो. नियमित व सुयोग्य व्यायाम असल्यास निरोगी, दीर्घकालीन, सुदृढ आरोग्य लाभते. रोगप्रतिकारक शक्ती वाढते. व्यायामाबारोबच विश्रांतीही तेवढीच महत्त्वाची आहे. आरोग्य आणि विश्रांती तेवढीच महत्त्वाची आहे. आरोग्य आणि विश्रांती या दोन्ही प्रक्रिया अंतरिक सहसंबंध आहे. व्यक्तीचे शरीर म्हणजे यंत्र नव्हे. विशिष्ट काळापर्यंत व्यक्ती एखादेच काम करू शकते. पुन्हा तिला थकवा येतो. तेव्हा विश्रांती गरजेची असते. योग्य प्रसंगी चांगल्या प्रकारची विश्रांती घेतल्यास विश्रांती नंतर व्यक्तीचे शरीर उत्साही बनते व कार्यक्षमता वाढण्यास मदत होते.

नोकरी

साधारणपणे व्यक्ती दोन प्रकारचे कार्य करते. बैठया स्वरुपाची आणि बौद्धीक स्वरुपाची काही कामे फारशी शारीरिक ताण न पडता व्यक्तीला करावी लागतात. काही कामे व्यक्तीला प्रत्यक्ष शारीरिक कष्ट करून आपली शक्ती उर्जा खर्च करून करावी लागतात. उदा. शेतमजूर, हमाल, कारखान्यातील कामगार इत्यादी व्यक्ती शारीरिक कष्टाची कामे करतात. कामाच्या स्वरूपावर आरोग्य विषयक स्थिती अवलंबून असते.

नोकरी करत असतांना मानसिक समाधान असणे अत्यंत गरजेचे आहे. मानसिक स्थिती व कामावरील वातावरण याचा देखील आरोग्यावर परिणाम होत असतो. म्हणून आनंदी वातावरणात काम केल्याने उत्साह वाढतो व कार्यक्षमता सुद्धा वाढण्यास मदत होते.

पर्यावरण

सभोवतालच्या परिस्थितीचा परिणाम आरोग्यावर होतो. व्यक्तीच्या कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, सामाजिक स्थिती समतोलाची राहू शकेल असे पर्यावरण लाभल्यास आरोग्याचा दर्जा उंचावतो

अशाप्रकारे व्यक्तीचे आरोग्य जपण्यासाठी किंवा व्यक्तीच्या आरोग्यासाठी वरील घटक महत्त्वपूर्ण असतात. जर व्यक्तीस आरोग्याने साथ दिली तर त्या व्यक्तीस ते काम करण्यास सांगेल ते काम करता येणार नाही. शरीर व मन निरोगी असणे ही व्यक्तीच्या दृष्टीने चांगले समजले जाते. कोणत्याही प्रकारचा वैद्यकीय उपचार न घेता व्यक्ती आपले जीवन जगात. तिच व्यक्ती खऱ्या अर्थाने सर्व बाबतींमध्ये श्रीमंत असते. ज्या व्यक्तीजवळ खूप पैसा आहे व त्यास रोगाने जर जर केले तर अशा व्यक्तीस जीवन जगणे कठीण जातेएखादी व्यक्ती जर निरोगी असेल तर संपूर्ण समाज सुद्धा निरोगी असावा लागतो. पण सर्व समाजामधील माणसे हे या ना त्या रोगाने आजारी पडलेले असतात. त्यामुळेच देशाच्या सर्वांगीण प्रगतीवर यांचा परिणाम पडतो.

ज्या देशातील समाज हा निरोगी असतो तो देश हा प्रगतीचा शेवटच्या बिंदूवर जावून पोहोचतो म्हणून या सर्व बाबींसाठी आरोग्य महत्त्वाचे असते. म्हणून दैनंदिन जीवनामध्ये आरोग्याला विशेष महत्त्व आहे व आपण त्याची काळजी घेतली पाहिजे. आरोग्य बिघडल्यावर सुधारत बसण्यापेक्षा, आरोग्य बिघडू नये म्हणून काळजी घेणे हे आपल्या प्रत्येकाच्या हातात आहे . म्हणतात ना आपले आरोग्य आपल्या हाती काळजी घ्या स्वत:ची.

## मान काळी पडली, नारळाच्या तेलात मिसळून हा एक पदार्थ लावा, लगेच होईल स्वच्छ

उन्हाळ्यामुळे किंवा प्रदूषणामुळे चेहरा काळवंडतो किंवा कधी कधी चेहऱ्यावर डाग येतात. यामुळे सौंदर्यात बाधा निर्माण होऊ शकते. चेहऱ्याच्या सौंदर्यांची काळजी प्रत्येकजण घेतोच. उन्हामुळं मानदेखील काळवंडते. पण मानेकडे सहसा लवकर लक्ष जात नाही. कधी कधी मानेवर मळ साचून राहिल्यामुळं व आंघोळ करताना नीट स्वच्छता न केल्यास मान काळी पडते. खरं तर मान काळी पडण्याची अनेक कारणे आहेत. कधी कधी काळी पडलेल्या मानेमुळंही सौंदर्य कमी होते. अशावेळी घरातीलच साहित्य वापरुन तुम्ही मानेचा रंग पुन्हा उजळू शकता.

मान काळी होण्याची कारणे!

मानेवर मळ साचल्याने, केस सतत खुले ठेवल्याने, मानेवर हायपरपिग्मेंटेशन झाल्यास, मानेवर टॅनिंग झाल्यास (ढरपपळपस) किंवा कधी कधी हार्मोनल कंडिशनमुळंही मान काळी होऊ शकते. अशावेळी घरगुती उपायांनी हा काळेपणा दूर केला जाऊ शकतो. हे उपाय खूपच सोप्पे असल्याने तुम्हाला जास्त मेहनत आणि वेळही वाया घालवावा लागत नाही.

काळी मान स्वच्छ करण्याचे घरगुती उपाय (होश ठशाशवळशी ढे उश्रशरप ऋीज्ञ छशलज्ञ) नारळ तेलाच्या मदतीने मानेचा काळेपणा कमी करु शकता. त्यासाठी तुम्हाला फक्त त्यात एक पदार्थ मिसळून मानेवर लावा. एका वाटीत नारळाचे तेल आणि लिंबाचा रस टाकून हे मिश्रण तयार करा. त्यानंतर आता हे मिश्रण १० मिनिटे मानेवर लावून ठेवा. काही वेळाने मान स्वच्छ धुवून घ्या. दररोज हे मिश्रण मानेला लावल्यास हळहळू काळपट पणा दूर होईल.

तुम्हाला लिंबाचा वापर नसेल करायचा तर तुम्ही नारळाच्या तेलाच कोरफडचे जेल वापरु शकता. ही पेस्ट तुम्ही रात्रभर मानेवर लावून ठेवू शकता.

हे घरगुती उपायही फायदेशीर

काळपट मान स्वच्छ करण्यासाठी बटाट्याचा रसही खूप फायदेशीर आहे. बटाट्याच्या रसात लिंबाचा रस पिळून हे मिश्रण मानेवर लावा. किंवा फक्त बटाट्याचा रसदेखील लावू शकता. कापसाच्या सहाय्याने मानेवर तुम्ही हे मिश्रण लावू शकता त्यानंतर मान धुवून घ्या. आठवड्यातून ३ ते ४ वेळा याचा वापर केल्यास काळी मान स्वच्छ होईल.

काळी मान स्वच्छ करण्यासाठी तुम्ही उटण्याचाही वापर करु शकता. हे उटणं बनवण्यासाठी तुम्ही बेसन, अर्धा चमचा लिंबू, हळद आणि दूध किंवा गुलाबपाणी टाकून पेस्ट बनवून घ्या. आता हे मिश्रण १५ मिनिटे मानेवर लावा आणि नंतर थोड्यावेळाने धुवून घ्या. आठवड्यातून दोनवेळा हे उटणं लावून घ्या यामुळं मान उजळेल. बेकिंग सोडादेखील तुम्ही काळी मान स्वच्छ करण्यासाठी वापरु शकता. एक चमचा बेकिंग सोडा घेवून त्यात पाणी मिसळा आणि आता ही पेस्ट १० मिनिटे मानेवर लावा. त्यानंतर मान ओल्या कपड्याने साफ करुन घ्या. बेकिंग सोडा मानेवरील मळ आणि डेड सेल हटवतो.

## दररोज फक्त १० मिनिटे चाला: या ५ चालण्याच्या पद्धतींची लावा सवय, तुमचे सांधे मजबूत होतील आणि शरीर संतुलन सुधारेल

आपण दिवसभर सारख्याच पद्धतीने चालतो... सरळ, सपाट आणि जलद. पण या पद्धतीमुळे कालांतराने स्नायू आणि सांधे कमकुवत होतात. विशेषतः ४० वर्षांनंतर पाठ, शिन आणि कंबरेचे स्नायू यांची पुरेशी हालचाल होत नाही आणि सांधे कडक होतात.

जरी तुमच्याकडे व्यायाम करण्यासाठी किंवा जिममध्ये जाण्यासाठी वेळ नसला तरी, या पाच वेगवेगळ्या चालण्यांपैकी फक्त १० मिनिटे तुमचे संतुलन, मुद्रा आणि लवचिकता सुधारू शकतात. तुमच्या शरीरासाठी दररोज मल्टीविटामिन घ्या असे समजा.

**१. पायाच्या बोटांवर चालणे (ताडासन) १ मिनिट**

पायाच्या बोटांवर चालत जा, टाचा उंच करा. तुमची छाती सरळ ठेवा, डोळे पुढे ठेवा आणि हात मोकळे ठेवा. यामुळे तुमचे पाय आणि पाठीचे स्नायू मजबूत होतात. त्यामुळे वाकण्याची प्रवृत्ती देखील कमी होते. तथापि, पुढे झुकण्याची आणि गुडघे टेकण्याची चूक टाळा. हे करण्याचा एक सोपा मार्ग म्हणजे भिंतीचा किंवा स्वयंपाकघरातील काउंटरचा हलका आधार घेणे.

**२. टाचांवर चालणे – १ मिनिट**

तुमच्या पायाची बोटे उंच करा आणि टाचांवर छोटी पावले टाका. यामुळे तुमच्या स्नायूंना बळकटी मिळते, गुडघ्यावर नियंत्रण सुधारते आणि घसरण्याचा धोका कमी होतो. तुमच्या पायाची बोटे खाली पडणार नाहीत आणि तुमचे गुडघे मागे झुकणार नाहीत याची खात्री करा. सर्वात सोपा मार्ग म्हणजे १० पावले टाचेने चालणे आणि १० पावले सामान्य चालणे एकत्र करणे.

**३. हिप रोटेशन वॉक – १ मिनिट**

पुढे जा, तुमचा गुडघा वर उचला आणि तुमचा पाय मांडीपासून बाहेरच्या दिशेने एका छोट्या वर्तुळात ठेवा. यामुळे कंबरेचा कडकपणा कमी होण्यास मदत होते, तुमच्या पाठीच्या खालच्या भागाला आराम मिळतो आणि तुमची स्ट्राइड लांबते. वर्तुळे लहान आणि नियंत्रित आहेत याची खात्री करा, तुमचे शरीर सरळ ठेवा.

**४. साइड-टू-साइड वॉक (हाफ स्क्वॅट) – १ मिनिट**

हलक्या पायाने बसा, तुमची पाठ, छाती वर आणि गुडघे ३० ते ४५ अंश वाकवा. आता उजवीकडे, नंतर डावीकडे पाऊल टाका. यामुळे मांडी आणि कंबर स्थिर करणारे (ग्लूट मेडियस) सक्रिय होतात. यामुळे पायऱ्या किंवा असमान जमिनीवर स्थिरता वाढते. तुमचे गुडघे तुमच्या पायाच्या बोटांच्या बरोबरीने आहेत याची खात्री करा.

**५. उलट दिशेने चालणे (मागे चालणे) २-५ मिनिटे**

सरळ उभे राहा, खांद्यावरून मागे वळून पाहा आणि लहान पावले मागे घ्या. यामुळे संतुलन आणि समन्वय सुधारतो, गुडघ्यांवर दबाव कमी होतो आणि मांडीच्या आतील स्नायू (व्हॅस्टस मेडियालिस) मजबूत होतात. सुरक्षिततेसाठी, एक मोकळा भाग, मोकळा मार्ग निवडा आणि गरज पडल्यास मदत घ्या.

**ते कधी करायचे?**

तुम्ही ते सकाळी आणि संध्याकाळी लहान स्लॉटमध्ये देखील करू शकता.

जिम सत्रांसाठी आणि बाहेर फिरायला जाण्यासाठी हे एक उत्तम आधार आहे.

हे सामान्य चालताना सुटलेल्या स्नायूंना प्रशिक्षित करण्यास मदत करतात.

**खबरदारी**

हे न घसरणाऱ्या जमिनीवर किंवा सपाट पादत्राणे घालून करा.

जर तुम्हाला गुडघे/घोट्यात वेदना होत असतील, चक्कर येत असेल किंवा अलीकडेच शस्त्रक्रिया झाली असेल तर डॉक्टर किंवा फिजिओचा सल्ला घ्या.

स्नायूंमध्ये थोडीशी उष्णता येणे सामान्य आहे; जर तुम्हाला तीव्र वेदना जाणवत असतील तर ताबडतोब थांबा.

## रम किंवा ब्रँडी प्यायल्यानंतर खरंच सर्दी-खोकला कमी होतो?

हिवाळा सुरू झाल्यानंतर सर्दी-खोकल्याच्या रुग्णांत वाढ होते. हवामान कोरडे असल्यामुळं सर्दी-खोकला बरा होण्यासही वेळ लागतो. अशावेळी मस्करी मस्करीमध्ये एक सल्ला दिला जातो. तो म्हणजे गरम पाण्यातून थोडी रम किंवा ब्रँडी पात्री प्या. जेणेकरुन तुमचा खोकला आणि सर्दी लगेचच ठिक होईल. पण हा दावा खरा आहे का. हिवाळ्यात किंवा खोकल्यावर औषध म्हणून ब्रँडी किंवा रम प्यावी का याला वैज्ञानिक आधार काय आहे व या दाव्यात किती सत्यता आहे, हे जाणून घेऊया.

**दारु कशी बनवली जाते**

सगळ्यात पहिले आपण दारू कशी बनवली जाते हे जाणून घेऊया. रमचा ही उष्ण असते. उसाच्या बायप्रोडक्टपासून रम बनवण्यात येते. तर ब्रँडी बनवण्यासाठी फळांचा रस आणि डिसिल्ड वाइनचा वापर केला जातो. थंड हवेच्या प्रदेशातील लोक जास्त करुन रम किंवा ब्रँडी पितात. हिवाळ्यात संध्याकाळी एक रम किंवा ब्रँडी प्यायल्याने शरीरात उष्णता निर्माण होते, असा दावा केला जातो.

**रम पिण्याने या आजार दूर होण्याचा दावा**

सर्दी-खोकला यांबरोबरच ब्रँडी आणि रम प्यायल्याने अनेक आजार दूर होतात, असा दावा केला जातो. यातच सांधे दुखी तसंच अर्थराइटिसवर देखील आराम मिळतो, असं सांगण्यात येते. त्याचबरोबर हृदयासंबंधी आजारांपासून सुटका होते. आर्टेरी ब्लॉकेजमध्येही फायदा होत असल्याचा दावा केला जातो. काही जण तर असाही दावा करतात की यामुळं श्वसनाचे विकार दूर होतात. कारण रम किंवा ब्रँडीमध्ये फ्लामेटरी गुण आढळले जातात, त्यामुळं असा दावा करण्यात येतो.

**तज्ज्ञ याबाबत काय म्हणतात**

दारूमुळं शरीरात उष्णता निर्माण होते, याला विज्ञानही दुजोरा देते. म्हणजेच जे अल्कोहोल जितके स्ट्रॉग असते तितकीच त्यामुळं जास्त उष्णता शरीराला मिळते. मात्र यामुळं आजार ठिक होतात हा दावा मात्र आधारहीन आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, अल्कोहोलमुळं शरीराला नुकसान होते. रम असो किंवा ब्रँडी यामुळं तुमच्या शरीरातील रोग प्रतिकारशक्ती कमजोर करते.

# शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक समुपदेशन महत्त्वाचे



आजच्या वेगवान आणि तणावपूर्ण जी-वनात, आपण अनेकदा आपल्या शारीरिक आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देतो. नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि डॉक्टरांच्या तपासणीसाठी वेळ काढतो; परंतु या धावपळीत आपण आपल्या मानसिक आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष करतो. मन आणि शरीर हे एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत, त्यामुळे शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य आणि त्यासाठीचे समुपदेशन महत्त्वाचे आहे. मन आणि शरीर यांचा अतूट संबंध आहे हे आपण विसरत-ो. मानसिक आणि शारीरिक आरोग्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

मानसिक ताणाचा शारीरिक परिणाम खूप धोकादायक असतो. दीर्घकाळ टिकणारा तणाव, चिंता आणि नैराश्य यांचा थेट परिणाम आपल्या शरीरावर होतो. यामुळे उच्च रक्तदाब, मधुमेह, पोटाचे विकार, रोगप्रतिकारशक्ती कमी होणे आणि हृदयविकार यांचा धोका वाढतो. उद-ाहरणार्थ, सततच्या तणावामुळे शरी-रात 'कॉर्टिसोल' नावाचे हार्मोन वाढते, जे शारीरिक आरोग्यासाठी हानिकारक ठरते. शारीरिक आरोग्याचा कळतनकळत आपल्या मानसिकतेवर प्रभाव पडत असतो तर चांगले शारीरिक आरोग्य मानसिकतेला सकारात्मकता देते. नियमित व्यायाम केल्याने एंडोर्फिन नावाचे आनंदी रसायन तयार होते, ज्यामुळे तणाव कमी होतो आणि मनःस्थिती सुधारते. जेव्हा मन स्वस्थ असते, तेव्हा शरीरही अधिक कार्यक्षमतेने काम करते. त्यामुळे, जेव्हा आपल्याला शारीरिक समस्या जाणवते, तेव्हा आपण जसे डॉक्टरकडे जातो, तसेच मानसिक अस्वस्थता जाणवल्यास समुपदेशकाकडे जाणे आवश्यक आहे. समुपदेशन म्हणजे एक प्रशिक्षित व्यावसायिक आणि संबंधित व्यक्ती यांच्यामध्ये होणारा एक सुरक्षित, गोपनीय आणि हेतुपूर्वक संवाद. यामध्ये समुपदेशक कोणत्याही प्रकारचा 'निर्णय' न देता, व्यक्तीला त्याच्या समस्या, भावना आणि विचार समजून घेण्यास मदत करतो. याला 'टॉक थेरपी' असेही म्हणतात. मानसिक आरोग्यासाठी समुपदेशन का आवश्यक आहे? हे जाणून घेणे गरजेचे आहे. समुपदेशनामुळे व्यक्तीला त्याच्या समस्यांच्या मूळ कारणांचा शोध घेता येतो. केवळ लक्षणांवर उपचार करण्याऐवजी, समुपदेशक जीवनातील सखोल संघर्ष आणि अनुभवांना समजून घेण्यास मदत करतो. भावनांची योग्य हाताळणी होते जसे की अनेकदा आपल्याला आपल्या भावना व्यक्त करता येत नाहीत किंवा त्या कशा हाताळायच्या हे समजत नाही. समुपदेशन या भावनांना मोकळी वाट करून देण्यासाठी एक सुरक्षित जागा पुरवते आणि भावनांना विधायक मार्गाने हाताळण्याचे कौशल्ये शिकवते. नकारात्मक विचारांवर नियंत्रण आणण्यासाठी समुपदेशन मदत करते.कॉग्निटिव्ह बिहेवियरल थेरपीसारख्या समुपदेशनाच्या तंत्रांमुळे नकारात्मक विचार पद्धती ओळखता येतात आणि त्या बदलण्यास मदत होते, यामुळे आत्मविश्वास वाढतो आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होतो. नातेसंबंधात सुधारणा करण्यासाठी व्यक्ती पुढाकार घ्यायला लागते.

# दिवाळीत काचेसारखी नितळ त्वचा हवीय?

**स्वतःला हायड्रेट ठेवा**

सगळ्यात पहिली आणि महत्त्वाची टिप म्हणजे स्वतःला हायड्रेट ठेवणं. कोणताही सण असो किंवा दैनंदिन दिवस स्वतःला हायड्रेट ठेवणे महत्त्वाचे आहे. कारण तुम्ही डिहायड्रेट झालात तर तुम्हाला ब्लोटिंग, गॅस आणि निस्तेज त्वचेला सामोरं जावं लागेल. त्यामुळे पाणी भरपूर प्रमाणात पिणे आवश्यक आहे. ज्यामुळे तुमची त्वचा देखील तजेलदार राहील.




**केळं न चुकता खा**

ऋजुता दिवेकरने सांगितलेला आणखी एक पर्याय म्हणजे न चुकता दररोज केळं खा. दिवाळीत अनेक पार्टी होतात. अशावेळी पार्टीला जाण्यापूर्वी केळं खाणं पसंत करा. केळं प्रीबायोटिक आहे. त्यामुळे पचनाला नक्कीच मदत होते. सणासुदीला आपण वेळ-ीअवेळी खातो. अशावेळी पचनाचा त्रास होऊ नये म्हणून केळ्याचा वापर करावा.

# सरकार समोर माओवाद्यांची अखेर

सुमारे साठ वर्षांपासून देशातल्या घनदाट जंगलात पसरलेला हिंसक माओवादी उद्रेक आता शेवटच्या घटका मोजतो आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी गडचिरोलीत मल्लोजुल्ला वेणुगोपाल उर्फ भूपती याने केलेलं आत्मसमर्पण ही या शेवटाची सुरुवात मानली जाते. १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधून सुरू झालेल्या या रक्तरंजित वाद-ळाने गेली ६० वर्षं देशातली घनदाट जंगलं आपल्या हिंसक कारवायांनी जागती ठेवली होती. लोकशाही व्यवस्थेत वंचितांना, विस्थापितांना, आदिवासींना न्याय मिळणं कधीच शक्य नाही; त्यासाठी मोठा उठाव व्हावा लागतो आणि सशस्त्र क्रांतीशिवाय त्याला पर्याय नाही, या श्रद्धेने गेली साठ वर्षं अनेक उच्चशिक्षित या चळवळीत सामील झाले.
आपल्या आयुष्याची राखरांगोळी करून त्यांनी जंगलातील आदिवासींना याच विचार पथ-ावर आणण्याचा प्रयत्न केला. बहुतेक ठिकाणी धाकदपटशाहीनेच. पश्चिम बंगालमधून सुरू झालेल्या या हिंसक चळवळीने नंतर आंध्र प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमा रेषांवर असलेल्या निबिड अरण्याला आपलं केंद्र बनवलं. अनेक निरपराध आदिवासींची 'खबऱ्या' असल्याच्या संशयावरून त्यांनी हत्या केली. पोलीस, सुरक्षा दलांविरोधात तर उघड युद्ध पुकारलं. या संघर्षात किती जणांचे जीव गेले, त्याची गणती नाही.
सुरुवातीला या चळवळीला करुणेची बैठक होती. वैचारिक मांडणीचा आधार होता. पण, नंतर हिंसा आणि त्यातून निर्माण होणारी दहशत एवढ्यापुरतंच तिचं अस्तित्व उरलं. देशाच्या अर्थव्यवस्थेने अनेक वळणं घेतली. केंद्रात आणि राज्यात अनेक सरकार बदलली.
या प्रत्येक सरकारचे विकासाचे कार्यक्रम, प्राधान्यक्रम होते. वंचितांसाठीच्या योजना होत्या. पण, नक्षल-वादी चळवळीने या विकासाला विरोध केला. असा विकास आदिवासी, वंचित समूहांतील उद्रेकाची शक्तीच मारून टाकतो, बंडखोरीची ठिणगी विझवण-ारा विकास नकोच, या नकारात्मक भावनेने त्यांनी





लोकशाही प्रक्रियेतून होणाऱ्या विकासालाच शत्रू मानलं. नक्षलवादी चळवळीचं वैचारिक भरकटणं यातूनच सुरू झालं. गेली काही वर्षं तर त्यांची धडपड स्वतःच्या अस्तित्वासाठीच सुरू होती. ज्या वंचित जनसमूहांसाठी त्यांनी वर्चस्वाचा त्याग केला, त्या जनसमूहांपासून त्यांची नाळ तुटली होती. ते जनसमूह नक्षलवाद्यांशी संघर्ष करत मूळ प्रवा-हात सामील होत होते. गेल्या दोन-तीन दिवसांत महाराष्ट्र आणि छत्तीसगडमध्ये झालेल्या दोन - तीनशे नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणामागे ही अपरिहार्यता आहे.भूपतीवर सहा कोटी रुपयांचं बक्षीस होतं. त्याचा मोठा भाऊ कोटेश्वरुलू उर्फ किशनजी २०११ मध्ये पश्चिम बंगालमध्ये झालेल्या चकमकीत मारला गेला. त्याच्या मृत्यूनंतर देशातील नक्षलव-ादी चळवळीचा संयोजक, रणनीतीकार, वैचारिक आधार म्हणून भूपतीकडेच पाहिलं जात होतं. तेलंगणातल्या करीमनगर जिल्ह्यात पेद्दापल्ली परिसरात त्याचं वास्तव्य होतं. त्याची पत्नी तारक्काने गेल्या वर्षीच आत्मसमर्पण केलं. किशनभाईच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी सुजातानेही अलीकडेच आत्मसमर्पण केलं. आत्मसमर्पण करून मुख्य प्रवा-हात सामील होण्यापूर्वी भूपतीने चळवळीची संघटनात्मक दुः स्थिती, वैचारिक अडचण आणि समाजमनातून कमी होत चाललेला पाठिंबा या तीनही बाबींचा सविस्तर ऊहापोह करून संपूर्ण नक्षलवादी चळवळीच्या समारोपाचा विषय मांडला होता. काल छत्तीसगडमध्ये ज्या २०० नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं, ते या भूपतीच्या आव्हानाचाच परिणाम मानला जातो. नक्षलवाद्यांचे प्रत्येक प्रदेशात म्होरके आहेत.
अशा म्होरक्यांपैकी दहा मुख्य सूत्रधारांचं गेल्या तीन दिवसांत आत्मसमर्पण झालं, ही साधी गोष्ट नाही. माओवादी पक्षाच्या केंद्रीय समितीचा सदस्य रुपेश याचाही यात समावेश आहे. मुख्य सूत्रधारांपैकी मांडवी हेडमा आणि तिरुपती उर्फ देवजी हे दोघेच अद्यापही विजनवासात आहेत. ते आणि त्यांचे काही सहकारी वगळता नक्षलवादी चळवळीत आता प्रभावी असे फार कोणी राहिले नाही, असा सुरक्षा यंत्रणांचा दावा आहे. २१ मे रोजी अबुझमाड येथे मारल्या गेलेल्या नरसिंह उर्फ नम्बाला केशवराव उर्फ बसवराजू याने मांडवी आणि तिरुपती या दोघांनाही त्याची हत्या होण्यापूर्वीच आत्मसमर्पणाचा सल्ला दिला होता. पण, तेव्हा त्यांनी तो मानला नाही. आजही ते वरमलेले नाहीत. याची दखल घेऊन सुरक्षा यंत्रणांनी त्यांच्या मागे लागलं पाहिजे. त्यांचं आत्मसमर्पण जेवढ्या लवकर होईल, तेवढं मोदी सरकारचं ३१ मार्च २०२६ पूर्वी संपूर्ण देश माओवादमुक्त करण्याचं ध्येय पूर्ण होईल.
लोकशाहीत कितीही दोष दिसत असले, तरीही आज लोकशाहीएवढी सर्वसमावेशक, न्यायतत्त्वावर आधारलेली, समतामूलक दुसरी चांगली व्यवस्था नाही. भारतीय लोकशाही तर अधिक लवचिक आहे. जगातल्या अन्य लोकशाही व्यवस्थांपेक्षा भारतीय व्यवस्थेत सुधारणा, संवाद आणि सामिलीकरणाच्या शक्यता सर्वाधिक आहेत. त्यामुळेच नक्षलवादासारखी जहाल, हिंसाधारीत क्रांतिकारक विचारसरणी इथे टिकाव धरू शकली नाही. क्रांतीच्या कल्पना हळूहळू विरत गेल्या. उत्क्रांतीचाच मार्ग अधिक शाश्वत आणि फलदायी असल्याच्या निष्कर्षावर देशातल्या जहालातल्या जहाल नक्षलवाद्यांनाही यावं लागलं. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही देशातील जनतेने अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या नेत्यांनाच आपलं नेतृत्व म्हणून का निवडलं, याचं उत्तर यात आहे.गेल्या तीन दिवसांत नक्षलवाद्यांचं मोठ्या संख्येने झालेलं आत्मसर्पण हा माओवादाचा पराभव आणि लोकशाहीचा विजय आहेच; पण त्याचं विश्लेषण केवळ एवढ्याने संपत नाही. नक्षलवादाचा, माओवादाचा पराभव करणं हे केवळ सुरक्षा आणि शांततेसाठी आवश्यक नव्हतं. त्यापेक्षाही ते विकासात्मक सामाजिक, राजकीय कारणांसाठी अधिक होतं. जसा आदिवासींनी, वंचित - शोषितांनी रचनात्मक विकासाचा मार्ग निवडला, तसं सरकारलाही आता या समूहांना विकास प्रक्रियेत वेगाने सामावून घ्यावं ला-गेल. १९६७ मध्ये नक्षलवादी चळवळीची मांडणी केली गेली, तेव्हाचा वर्गसंघर्ष, वर्गशत्रू वेगळे होते. बदलत्या अर्थव्यवस्थेने, जागतिकीकरणाने त्याचे सगळे आयामच बदलून टाकले. नक्षलवादी चळवळ कमकुवत, सैरभैर, संदर्भहीन ठरण्याला तेही एक कारण ठरलं. नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणाने निबिड अरण्यात शांतता राहील. पण, नुसत्या शांततेने भागणार नाही. तिथे न्यायही पोहोचला पाहिजे. आदिवासींचे विस्थापन होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. त्यांचं शोषण करणारी व्यवस्था कमजोर झाली पाहिजे. नक्षलवादाचा मार्ग नाकारून आपण शांततापूर्ण विकासाचा, रचनात्मक लोकशाहीचा मार्ग निवडला ते योग्यच केलं, असा विश्वास त्यांच्यात निर्माण झाला पाहिजे. तो खरा लोकशाहीचा विजय असेल!

## डॉक्टर टीप्स

### अल्झायमर समजून घेताना...

**अल्झायमर प्रतिबंध**

- आहारात फळे, भाजीपाला, मासे यांचे योग्य प्रमाण असल्यास काही प्रमाणात आजाराला प्रतिबंध होतो.ङ- मधुमेह, अतिरक्तदाब, रक्तात कोलेस्टेरॉलचे जास्त प्रमाण, धूम्रपान हे सर्व या आजाराची शक्यता वाढवतात.- मेंदूला चेतना देणारे खेळ, संगीत, सामाजिक कार्यक्रमात सहभाग, द्विभाषिक व्यवहार आदीमुळे आजाराला प्रतिबंध होतो.- रंगात वापरली जाणारी सॉल्वंट रसायनेही या आजाराला निमंत्रण देतात असे दिसते.



**अल्झायमरग्रस्तांना समजून घेताना...**

- या आजारावर निश्चित वैद्यकीय औषधे अद्याप नाहीत. काही औषधांचा वापर केला जातो, पण उपयोग मर्यादित आहे. याशिवाय अधिक संशोधन सुरू आहे.
- घरातील इतर व्यक्तींवर या आज-ारी माणसाची विशेष जबाबदारी येऊन पडते, त्यांनी संवेदनेने या रुग्णांना समजून घ्यायला हवे.- सुरक्षितता : आजुबाजूची खोली, वस्तू, व्यवहार सुरक्षित होतील अशी काळजी घ्यायला हवी.

## विनोद




गिऱ्हाईक : मी एक चूक केली.
वेटर : काय झाले साहेब?
गिऱ्हाईक : तुला 'टिप' द्यायच्याऐवजी मी ती तुझ्या मालकाला दिली.
वेटर : मोठीच चूक झाली साहेब. आता ती मला कधीही मिळणार नाही.

## संदेश

Movie titles related to engg students:
exams – socha na tha,
classes – kabhi kabhi,
question papers – na tum jano na hum,
copying – yaarana,
maths2 – asambhav,
maths1 – mission impossible,
environmental sciences – pyar mein kabhi kabhi,
1st semester – kuch to hai,
2nd semester – yeh kya ho raha hai,
distinction – kal ho na ho,
1st class – raju bangaya gentleman,
2nd class – dil mange more
fail – phir milenge

## सुविचार

राग जाळा नाही तर तो तुम्हाला जाळेल.
**– अज्ञात**




**संस्कृत सुभाषित**

**न स्वप्नेन जयेन्निद्रां, न कामेन जयेत् स्त्रियम।**
**नेन्धनेन जयेदग्निं, न पानेन जयेत् सुरा ।।**

**अर्थ –** अतिनिद्रेची इच्छा बाळगून निद्रेवर विजय मिळवता येत नाही. स्त्रीची कामवासना कामोपभोगाने शमत नाही, उलट ती वाढते, अग्नीत जळण घातल्याने तो जास्त भडकतो. अतिमद्यपानाची आसक्ती धरून मद्यपानाची इच्छा शमत नाही, उलट ती भडकते. भोगाचा अतिरेक केल्याने भोगाची इच्छा वाढतच जाते.

# महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. मृत्यूवर विजय मिळविणारा
४. फायदेशीर, हितावह
७. अवाजवी
१०. संगीतातील एक राग
१२. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१४. मला
१५. रसाने भरलेले, उदा.वर्णन
१८. लबाडीचा हेतू
१९. राबता, जाणे-येणे
२१. मऊ
२२. सद्वर्तन
२३. पळसाच्या पानांची संख्या
२४. बेकरीतील एक पदार्थ
२५. लेखणी
२७. उद्याच्या नंतरचा दिवस
२८. नेभळट मनुष्य
३०. प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार परमेश्वर प्रतीत होतो या अर्थाची उक्ती. '-- -- -- देव!'
३२. एक चर्मवाद्य
३३. वांग्याचा खमंग पदार्थ
३४. तलमसुती कापड
३६. हिंमत, धैर्य
३८. गावातील गप्पाष्टकाची जागा
३९. छोटी बैलगाडी
४१. जन्म
४२. चिनीमातीची वाटी
४२अ. घरटे (संस्कृत)
४४. पत्नी
४५. फणसातील खाद्यभाग
४६. च्या शिवाय
४८. दरवाजा
४९. चंद्र
५०. तबकातील या शूभ्र पदार्थाने वाता-वरणशुद्धी होते
५१. रामचरित मानस लिहिणारे रामभक्त संत
५४. समाचार
५५. भांडण
५६. नमस्कार
५७. नवे कोरे
५९. कमळ
६१. बासरी
६२. कोलकाताचे विमानतळ
६४. व्रत
६७. टाळ्यांचा आवाज
६८. हिंदीत पाऊल, मराठीतले एक आडनाव
६९. प्रज्वलित, तापलेले

## उभे शब्द

१. हरिण, एक नक्षत्र
२. महाभारताचे मूळ नाव
३. मृत्यूदेवता
५. लवकर, वेगाने
६. बशीचा जोडीदार
७. अभिनेता
८. चणचण
९. अखबार
११. पुरुष
१३. चाणक्यनीती
१४. वर्षाचा बारवा भाग
१६. एक मंगलवाद्य
१७. वीस दस्ते कागद
१९अ. संक्रांतीचे दान
२०. रोखलेली नजर
२२. मनाला टोचणारे दुःख
२५. व्यायाम, परेड
२६. शाकंभरी पौर्णिमेचा मराठी महिना
२७. पुन्हापुन्हा
२८. माळेतील मधला मोठा मणी
२९. दिल्लीचे विमानतळ
३१. निषिद्ध, त्यागलेले
३५. नव्वद अंशाच्या आतील कोन
३६. महासर्प
३७. सिंहाची उपाधी
३८. बसण्याची फळी
४०. झकास, छान
४२. अनाथच्या विरुद्ध
४३. धडक
४४. पोते
४६. गणपतीचे एक नाव
४७. असामान्य, तुलना करता येणार नाही असा
४८. राजा-राणीची सेविका
५२. लाट, झटका, हुक्की
५३. एकूण एक सर्व
५४. कडक व चिवट
५७. दरवाजा
५८. नरमच्या विरुद्ध
६०. एक गळीत धान्य
६१. पवित्र
६३. हत्तीच्या गंडस्थळातील स्राव
६५. तात्पर्य
६६. दुःख, हळहळ

## आडवे उत्तर

१.मृत्युंजय ४.लाभदायक ७.अव-ास्तव १०.यमन १२.पसायदान १४.मज १५.रसभरीत १८.कावा १९.वहिवाट २१.नरम २२.सदाचार २३.तीन २४.नानकटाई २५.कलम २७.परवा २८.मेषपात्र ३०.जसा भाव तसा ३२.डमरु ३३.भरीत ३४.मलमल ३६.अवसान ३८.पार ३९.दमणी ४१.जनन ४२.सट ४२अ.कोटर ४४.बायको ४५.गरा ४६.विना ४८.दार ४९.रजनीनाथ ५०.कापूर ५१.तुलसीदास ५४.वार्ता ५५.कलह ५६.नमन ५७.करकरीत ५९.नीरज ६१.पावा ६२.डमडम ६४.वसा ६७.कडकडाट ६८.कदम ६९.रसरशीत

## उभे उत्तर

१.मृग २.जय ३.यम ५.भरभर ६.कप ७.अदाकार ८.वानवा ९.वर्तमानपत्र ११.नर १३.साम दाम दंड भेद १४.महिना १६.सनई १७.रीम १९अ.वानवसा २०.टक २२.सल २५.कवायत २६.पौष २७.परतपरत २८.मेरुमणी २९.पालम ३१.वर्ज्य ३५.लघुकोन ३६.अजगर ३७.वनराज ३८.पाट ४०.मस्त ४२.सनाथ ४३.टक्कर ४४.बारदान ४६.विनायक ४७.अतुलनीय ४८.दासी ५२.लहर ५३.समस्त ५४.वातड ५७.कवाड ५८.कडक ६०.जवस ६१.पाक ६३.मद ६५.सार ६६.खंत





## अप्सरेपेक्षा कमी सुंदर नव्हती ही अभिनेत्री


# ड्रायव्हरने अभिनेत्रीच्या शरिरावर केले चाकूने १७ वार





: भारतीय चित्रपटसृष्टीत अशा अनेक अभिनेत्री आहेत ज्यांनी अशा कठीण प्रसंगांना तोंड दिले आहे. अशाच एका दक्षिण भारतीय अभिनेत्री राणी पद्मिनी होत्या, ज्या एखाद्या स्वर्गीय देवतेपेक्षा कमी दिसत नव्हत्या. पद्मिनी ही डबिंग कलाकार इंद्रा कुमारीची मुलगी होती आणि तिचा जन्म १९६२ मध्ये झाला होता. इंद्राला तिची मुलगी एके दिवशी चित्रपटसृष्टीतील एक प्रमुख नायिका बनावी असे वाटत होते.
तिने तिच्या मुलीचे नाव पद्मिनी ठेवले कारण तिला नर्तक आणि अभिनेत्री पद्मिनीची खूप आवड होती. म्हणूनच, तिने लहानपणाप-ासूनच तिच्या मुलीला नृत्य शिकवायला सुरुवात केली आणि ती मोठी झाल्यावर तिला मुंबईत आणले.
इंदिरा आणि तिची मुलगी पद्मिनी यांनी मुंबईत खूप संघर्ष केला, पण काहीही काम झाले नाही. आई आणि मुलगी टिकून राहिली. १९८१ मध्ये पद्मिनीला 'वलंगम वीणायम' या चित्रपटातून मल्याळम चित्रपटसृष्टीत ब्रेक मिळाला. या चित्रपटात तिने एक छोटीशी भूमिका साकारली. त्यानंतर पद्मिनीला 'शंकरशम' हा चित्रपट मिळाला. त्यानंतर पद्मिनीसाठी चित्रपटसृष्टीचे दरवाजे उघडले. तिने दक्षिणेतील सुपरस्टार मोहनलाल आणि मामूटी यांच्यासोबतही काम केले आहे. त्यानंतर ती कॉलिवुडमध्ये गेली आणि माइक मोहन, कार्ती आणि राजकुमार सेतुपती सारख्या स्टार्ससोबत काम करू लागली. तमिळ चित्रपटसृष्टीत, पद्मिनीने तिचे नाव पद्मिनी वरून राणी पद्मिनी असे बदलले. तिने कन्नड, मल्याळम आणि तमिळ चित्रपटसृष्टीतील सुमारे ६० चित्रपटांमध्ये काम केले.
ही घटना अभिनेत्रीच्या आयुष्यात घडली पद्मिनी हळूहळू प्रगती करत गेली आणि तिची आर्थिक परिस्थिती सुधारली. पैसे कमावल्यानंतर, तिने चेन्नईतील अण्णा नगर येथे सहा खोल्यांचा एक आलिशान बंगला खरेदी केला आणि तिच्या आईसोबत राहायला गेली. त्यानंतर अभिनेत्रीने वर्तमानपत्रात एक जाहिरात दिली, ज्यामध्ये स्वयंपाकी, चौकीदार आणि ड्रायव्हरची मागणी केली. एके दिवशी, पद्मिनी शूटिंगवरून घरी परतत असताना, तिच्या ड्रायव्हरने काही कारणास्तव तिच्या गालावर थाप मारली. अभिनेत्रीने ताबडतोब त्याला कामावरून काढून टाकले.बदला घेण्याच्या इच्छेने प्रेरित झालेल्या ड्रायव्हरने स्वयंपाकी आणि चौकीदाराच्या मदतीने अभिनेत्रीचे घर लुटण्याचा कट रचला. यासाठी, ड्रायव्हरने एक मोठा चाकू खर-ेदी केला आणि तो चोरी करण्यासाठी अभिनेत्रीच्या घरी गेला. इंद्राने ड्रायव्हरला पाहिले आणि तिच्यावर वार केला. आईच्या ओरडण्याचा आवाज ऐकून पद्मिनी तिथे पोहोचली तेव्हा ड्रायव्हरने अभिनेत्रीच्या छातीवर १७ वेळा वार केले. या अपघातात अभिनेत्रीचा वयाच्या २३ व्या वर्षी मृत्यू झाला.

# कॉमेडी किंग कपिल शर्माच्या कॅफेवर पुन्हा गोळीबार



कॅनडा-प्रसिद्ध विनोदी कलाकार कपिल शर्माच्या कॅप्स कॅफेवर पुन्हा एकदा गोळीबार झाला असून, गेल्या चार महिन्यांत ही तिसरी घटना आहे. बुधवारी रात्री उशिरा झालेल्या या हल्ल्याची जबाबदारी कुख्यात गुंड गोल्डी ढिल्लन आणि कुलदीप सिद्धू यांनी स्वीकारली आहे. दो-घेही लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधित असल्याचे सूत्रांकडून सांगितले जातेय.
सोशल मीडियावर वायरल झालेल्या एका व्हिडिओमध्ये, एका वाहनातून गोळीबार होताना स्पष्ट दिसत आहे. खिडकीतून हात बाहेर काढून एका व्यक्तीने पिस्तूलमधून सलग गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात सुमारे सहा गोळ्या झाडण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. हल्ल्यानंतर ढिल्लन आणि सिद्धू यांनी एक पोस्ट करून जबाबदारी स्वीकारली आणि सर्वसामान्य नागरिकांना दूर राहण्याचा इशारा दिला. त्यांच्या म्हणण्यानुसार, ''आमचे सामान्य लोकांशी कोणतेही वैर नाही. आमचा वाद फक्त काही विशिष्ट लोकांशी आहे. जे बेकायदेशीर कामात गुंतले आहेत आणि आपले पैसे देत नाहीत, त्यांनी सज्ज राहावे.''
त्यांनी बॉलिवूडमध्ये ''धर्माविरुद्ध बोलणाऱ्यांनाही'' चेतावणी दिली ''गोळ्या कुठूनही येऊ शकतात, तयार राहा,'' असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले.
याआधी, ८ ऑगस्ट रोजी झालेल्या दुसऱ्या हल्ल्यात सुमारे २५ गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. त्या घटनेतील व्हिडिओत हल्लेखोरांचा आवाज ऐकू येतो – ''आम्ही लक्ष्याला फोन केला पण त्याने प्रतिसाद दिला नाही, म्हणून आम्हाला कारवाई करावी लागली. जर आता तरी त्याने रिंग ऐकली नाही, तर पुढील कारवाई मुंबईत होईल.'' या इशाऱ्यानंतर कपिल शर्माच्या मुंबईतील घराबाहेर पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला.
पहिला हल्ला १० जुलै रोजी झाला होता. त्या वेळी काही कर्मचारी कॅफेत उपस्थित होते. कोणीही जखमी झाले नसले तरी कॅफेच्या खिडक्यांवर दहा हून अधिक गोळ्या लागल्या होत्या.
पहिल्या घटनेनंतर, बब्बर खालसा इंटरनॅशनल या दहशतवादी संघटनेशी संबंधित हरजीत सिंग लड्डी याने जबाबदारी स्वीकारली होती. त्याने सांगितले की कपिल शर्माच्या कार्यक्रमात एका कलाकाराने निहंग शिखांच्या पारंपरिक पोशाखांवर विनोद केला होता, ज्यामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्या.
बिकेआय या संघटनेला कॅनडाच्या सरकारने दहशतवादी संघटना घोषित केले आहे, तर हरजीत सिंग लड्डी हा भारताच्या राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या सर्वाधिक वॉन्टेड यादीत समाविष्ट



# डोनाल्ड पप्पांनी माझ्यासाठी बंगला बांधलाय

## ड्रामेबाज राखी सावंतचा नवा दावा, नेटकऱ्यांकडून तान्या मित्तलशी तुलना



मुंबई - बॉलिवूडची ड्रामेबाज, टीआरपी क्वीन राखी सावंत या-ना त्या कारणानं चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून ती आणि तिचे नवनवे दावे, चर्चेचा विषय ठरत आहेत. अलिकडेच मुंबईला परतलेली राखी सावंत सोशल मीडियावर चर्चेत आहे. अशातच आता राखी सावंतचा एक व्हिडीओ समोर आला आहे. हा व्हिडीओ पाहून आता राखी सावंतने मबिग बॉस १९फच्या घरातल्या तान्या मित्तलच्या पावलावर पाऊल ठेवत असल्याचे बोलत आहेत. बिग बॉसमधली तान्या मित्तल दररोज नवनवे दावे करते, श्रीमंतीचा बडेजावपणा करते. तसंच राखी करत असल्याचे युजर्सचे म्हणणे आहे. या व्हिडीओमध्ये राखी सावंत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याबद्दल बोलत आहे. राखी म्हणतेय की, माझ्या डोनाल्ड पप्पांनी माझ्यासाठी बंगला बांधलाय... राखी सावंतचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. या व्हिडीओमध्ये राखी म्हणतेय की, मफधन्यवाद... पप्पा डोनाल्ड ट्रम्प... माझे डोनाल्ड बाबा माझ्यासाठी सर्व काही करतात. त्यांनी अमेरिकेत माझ्यासाठी एक मोठा बंगला बांधलाय...फ्फ राखी बोलत असतानाच कुणीतरी मधे काहीतरी कमेंट करतं. तर राखी म्हणते, मफबंगलोर नाही, तर एक बंगला...फ्फ मफट्रम्प पप्पांनी मला फवरेट कार गिफ्ट केलीय...फ्फ व्हिडीओमध्ये राखी सावंत पुढे म्हणाली की, मफमी लंडनला जातेय. अमेरिकेला जातेय... पप्पा डोनाल्ड ट्रम्प यानी माझी फेवरेट कार दिली आहे. ट्रम्प माझे पप्पा आहे...फ्फ राखीच्या व्हिडीओवर युजर्स तीव्र प्रतिक्रिया देत आहेत आणि तान्या मित्तलचं नाव घेऊन टीका करत आहेत. अनेकजण असेही म्हणतात की, राखी या व्हिडीओद्वारे तान्या मित्तलला ट्रोल करतेय. एका युजरने कमेंट केलीय की, मफतान्या मित्तल प्रोफ्फ तर दुसऱ्या युजरने लिहिलेय की, मफराखी ट्रम्प अमेरिकेच्या पुढच्या राष्ट्रपती...फ्फ आणखी एकाने लिहिलेय की, मफती तान्या मित्तल-पासून इंस्पायर आहे...फ्फ
बिग बॉस १९ मध्ये राखी सावंत घेणार एन्ट्री ?राखी सावंत मुंबईत परतल्यापासून, पुन्हा एकदा बिग बॉसमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा आहे. ती यापूर्वी बिग बॉसच्या तीन सीझनमध्ये दिसली आहे आणि आता अशी चर्चा आहे की, निर्माते तिला एन्टरटेन्मेटचा तडका देण्यासाठी चौथ्या सीझनमध्ये परत आणू शकतात. राखी सावंत पहिल्यांदा बिग बॉसच्या पहिल्या सीझनमध्ये दिस-लेली. त्यानंतर ती बिग बॉस सीझन १४ आणि नंतर बिग बॉस सीझन १५ मध्येही दिसलेली. अशातच आता राखी सावंत बिग बॉसच्या घरात जाणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



# पैसे भरायला सांगताच शिल्पा शेट्टीचा विचार बदलला

मुंबई,१६ ऑक्टोबर (पीएसआय)
बॉलिवूड फिटनेस आयकॉन शिल्पा शेट्टी आणि तिचा नवरा राज कुंद्रा या दोघांवर ६० कोटींच्या फसवणुकीचा आरोप आहे. हा खटला मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. अलिकडेच न्यायालयाने कारवाई करत या जोडप्याला देश सोडून जाऊ नये असे आदेश दिले. यावर युक्तिवाद करताना शिल्पा शेट्टी आणि राजच्या वकिलाने कामासाठी परदेशी जाणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद केला. या युक्तिवाद करताच न्यायालयाने एक अट घातली. ही अट समजताच शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा या दोघांनी परदेशी जाण्याचा विचार सोडून दिला आहे.
मुंबई उच्च न्यायालयाने शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा या दोघांना परदेशात जाण्यापूर्वी ६० कोटी जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. ६० कोटींच्या फसवणुकीशी संबंधित एफआयआर संदर्भात त्यांच्याविरुद्ध जारी केलेला एलओसी रद्द करण्यासाठी या जोडप्याने उच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर हा आदेश देण्यात आला आहे.
शिल्पा शेट्टीने न्यायालयाला माहिती दिली शिल्पा शेट्टीने आता मुंबई उच्च न्यायालयाला कळवले आहे की तिने तिचा नियोजित परदेश दौरा रद्द केला आहे. तिने सांगितले की न्यायालयाकडून परवानगी नसल्यामुळे तिने हा दौरा रद्द केला आहे.
दोन्ही वेळा उच्च न्यायालयाने दिलासा देण्यास दिला नकार
लूकआउट नोटीस रद्द करण्याच्या प्रकरणावर दोनदा सुना-वणी झाली आणि दोन्ही वेळा न्यायालयाने शिल्पा शेट्टीला दिलासा देण्यास नकार दिला.
नेमकं प्रकरण काय ?
उद्योगपती दीपक कोठारी यांनी अलीकडेच शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्याविरुद्ध फसवणुकीचा खटला दाखल केला आहे. कोठारींचा आरोप आहे की शिल्पा शेट्टीने तिच्या कंपनीचा विस्तार करण्यासाठी ७५ कोटींचे कर्ज घेतले होते, परंतु व्याजदरांमुळे ते वैयक्तिक गुंतवणूक म्हणून घेण्यास सांगितले. तिने कोठारींना आश्वासन दिले की ती मासिक व्याज देईन, परंतु शिल्पाने ते पैसे व्यवसायात गुंतवले नाहीत, त्याऐवजी ते वैयक्तिक खर्चासाठी वापरले आणि नंतर संचालकपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर दीपक कोठारी यांनी अभिनेत्रीला वारंवार पैसे परत करण्याची मागणी केली, परंतु कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. अखेर दीपक कोठारी यांनी शिल्पा शेट्टी व राज कुंद्रा यांच्यावर फौजदारी खटला दाखल केला आहे.



# भ्रष्टाचारावर आधारित निर्धार चित्रपटातील पहिले पोस्टर रिलीज...




मुंबई -आजवर बरेच मराठी चित्रपट समाजाला आरसा दाखवत आहे. समाजात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब नेहमीच रुपेरी पडद्यावर आपल्याला पाहायला मिळते. याद्वारे काही चित्रपटांनी समाजाला नवी दिशा दिली आहे. आता याचं पार्श्वभूमीवर मनिर्धारफ हा मराठी चित्रपट येत्या २८ नोव्हेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात रिलीज होत आहे. दरम्यान प्रभादेवी येथील श्री सिद्धिविनायक मंदिरामध्ये गणरायाच्या आशीर्वादानं मनिर्धारफ्चे पहिले पोस्टर प्रदर्शित करण्यात आलं. याप्रसंगी श्री सिद्धिविनायक मंदिर विश्वस्त श्री. महेश मुदलीयार आणि जितेंद्र राऊत चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक, कलाकार आणि तंत्रज्ञ मंडळी उपस्थित होते. जयलक्ष्मी क्रिएशनच्या बॅनरखाली निर्मात्या पद्मजा वालावलकर यांनी मनिर्धारफ चित्रपटाची निर्मिती केली आहे. दरम्यान दिनानाथ वालावलकर यांनी लिहिलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन दिलीप भोपळे यांनी केलंय. या चित्रपटाचे पोस्टर देशभक्तीची भावना जागवणारे आहे. पोस्टरवरील तिरंग्याची अनोखी झलक लक्ष वेधणारी आहे.मनिर्धारफचित्रपटाची कहाणी : या चित्रपटामध्ये डॉ. गिरीश ओक आणि सौरभ गोगटे मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. मनिर्धारफ चित्रपटामध्ये एक वेळीचं शैली प्रेक्षकांना या कलाकारांची पाहायला मिळणार आहे. या चित्रपटातील तरुणाई, वास्तवातील तरुणाईला भ्रष्टाचाराबाबत सज्ज करेल.
मनिर्धारफमध्ये भ्रष्ट समाजव्यवस्थेवर प्रहार करण्याचा प्रयत्न आणि याला विरोध करण्याची लढाई प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. भ्रष्टाचारीरूपी राक्षसाला भस्मसात करण्यासाठी संघर्ष करत समाजापुढे नवा आदर्श ठेवणाऱ्या तरुण पिढीची कहाणी या चित्रपटात आहे.मनिर्धारफ चित्रपटाबद्दल : या चित्रपटाच्या निर्मात्या पद्मजा वालावलकर यांनी या चित्रपटाबाबत म्हटलं, मफसमाजात वावरत असताना आणि समाजासाठी कार्य करीत असताना आपणही समाजाचे काही देणे लागतो याची जाणीव कायम मनात होती. त्याच भावनेतून मनिर्धारफ या प्रेरणादायी आणि स्फूर्तीदायक चित्रपटाची निर्मिती केली आहे. हा निर्धार कसला, कोणी आणि का केला आहे, हे पाहणे प्रेक्षकांसाठी उत्सुकतेचे ठरणार आहे. मनिर्धारफ्चे पहिले पोस्टर खऱ्या अर्थानं कुतूहल जागविणारे असून, चित्रपटाबाबत उत्सुकता वाढवणारे आहे. हा चित्रपट नक्कीच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल.फ्फ असा ठाम विश्वासही पद्मजा वालावलकर यांनी व्यक्त केला. यानंतर डॉ. गिरीश ओक आणि सौरभ गोगटे यांच्या जोडीला मनिर्धारफमध्ये पल्लवी पटवर्धन, प्रज्ञा केळकर, अभिनव कुरणे, मिलिंद ऊके, ऋतुजा कनोजिया, उमेश बोळके, जान्हवी सावंत, , अभय पाटील, श्रेयस मोहिते, दिनानाथ वालावलकर, युवराज झुगर, केतकी पाटील, पल्लवी प्रसाद, आनंद पाटील, सुरेंद्र केतकर, विद्या डांगे, एन. डी. चौगुले आणि कोमल रणदिवे यांची साथ लाभली आहे. पिकल एंटरटेनमेंट या चित्रपटाचे वितरण असून रंगभूषा अतुल शिधये करत आहे आणि वेशभूषा प्रशांत पारकर यांनी केली आहे. राहुल पाटील सहदिग्दर्शक या चित्रपटाचे असून, संतोष जाधव प्रमुख सहाय्यक दिग्दर्शक आहेत.

# रेणापूर नगरपंचायत निवडणूक जिंकून वार्डांचा विकास साधणार

## प्रदेश काँग्रेस प्रवक्ते,माजी आमदार धिरज देशमुख यांच्या उपस्थितीत काँग्रेस कार्यकर्त्यांचा निर्धार

**लातूर/प्रतिनिधी** : रेणापूर नगर पंचायतीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने रेणापूर काँग्रेस कमिटीच्या वतीने आयोजित कार्यकर्ता बैठकीस प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते,जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते यांची आढावा बैठक संपन्न झाली.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, माजी जि प अध्यक्ष संतोष देशमुख रेणा चे व्हा चेअरमन प्रविण पाटील ,रेणापूर कॉग्रेसचे तालुकाध्यक्ष अॅड प्रमोद जाधव , कृउबाचे सभापती उमाकांत खलंग्रे, उपसभापती अॅड. शेषेराव हाके, संत शिरोमणीचे व्हा चेअरमन सचिन पाटील,माजी सभापती दिलीपराव पाटील रेणाचे संचालक तुकाराम कोल्हे, चंद्रचूड चव्हाण, गोविंद पाटील, बालाजी हाके, रेणापूर शहर काँग्रेस अध्यक्ष पदमसिंह पाटील सतीश पाटील, पंडीत माने, सुरेश लहाने, अशोक पाटील, दिलीप





गोटके, प्रदिप राठोड, गजेंद्र चव्हाण यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

काँग्रेस पक्षाला जनसेवेची उज्वल परंपरा लाभलेली आहे.देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होवून काँग्रेस जणांनी देशाच्या विकासाचा पाया रचला.जनतेने नेहमीच काँग्रेस विचाराला साथ दिली आहे.नागरी समस्यांसाठी काम करत असताना होवू घातलेल्या रेणापूर नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेसची सत्ता आणण्यासाठी आम्ही सारे प्रयत्नशील आहोत अशी भावना व्यक्त करून धिरज विलासराव देशमुख साहेब म्हणाले की,रेणापूर तालुक्यातील विकासाच्या दृष्टीने जे काही चांगले करता येईल ते करण्याचा प्रयत्न सातत्याने आम्ही केला आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात रेणापूर नगरपंचायतीसाठी मोठ्या प्रमाणात निधी आणून विविध वार्डांचा विकास साधला.हे काम करत असताना भेदभाव न करता जनतेच्या हिताला आम्ही प्राधान्य दिले असल्याचे ते म्हणाले.

यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंखे म्हणाले की, काँग्रेस कार्यकर्त्यांनी एक दिलाने रेणापूर नगर पंचायत निवडणूकीस सामोरे जावे. आपसातील मतभेद बाजूला सारून नगरपंचायती अंतर्गत येणाऱ्या विविध वार्डांचा विकास करून लोकांना त्यांच्या हक्काचे लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत असं ते म्हणाले.

होवू घातलेली रेणापूर नगरपंचायत निवडणूक आम्ही पुर्ण ताकदीने लढवणार असून काँग्रेस विचाराचा अध्यक्ष व सदस्य निवडून आणण्यासाठी ठाम निर्धार सर्वांनी यावेळी केला. या कायक्रमाचे सुत्रसंचलन रहिम पठाण यांनी तर मनोगत व आभार पदमसिंह पाटील यांनी मानले . या संवाद बैठकीस रेणापूर शहरातील कॉग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## केशवराजच्या विद्यार्थिनीस एक लाख रुपयांचे पारितोषिक



**लातूर/प्रतिनिधी** :माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा – २०२५ या परीक्षेत श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रावणी सोमेश्वर ईश्वरशेटे हिने लातूर बोर्डातून प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल लातूर बोर्डाने कै. नीलकंठ खाडीलकर यांच्या नावे दिले जाणारे एक लाख रुपयांचे पारितोषिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. श्रावणी सोमेश्वर ईश्वरशेटे हिला दिले आहे. तिच्या या यशाबद्दल विद्यालयाच्यावतीने तिचा पालकासमवेत सत्कार करण्यात आला.

या तिच्या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्रजी आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी, मागील वर्षाचे दहावी प्रमुख शैलजा देशमुख, सहप्रमुख संजय आढाव, विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## दयानंद विज्ञानमध्ये औद्योगिक क्रांती या विषयावर एक दिवसीय परिसंवाद व औद्योगिक रसायनशास्त्र विद्यार्थी मंडळाची स्थापना




**लातूर/प्रतिनिधी** : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील औद्योगिक रसायनशास्त्र विभागातर्फे दि.११ ऑक्टोबर २०२५ रोजी १९४७ ते १९२५ या कालखंडातील औद्योगिक क्रांती या विषयावर एक दिवसीय परिसंवाद व औद्योगिक रसायनशास्त्र विद्यार्थी मंडळाच्या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे होते.याप्रसंगी पाहुणे म्हणून दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथील प्रा.प्रसाद कावळे, कार्यक्रम संयोजक व औद्योगिक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आण्णाराव चौगुले,संघटन सचिव प्रा.राहुल जाधव,आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार,डॉ. निर्मला चिवडशेट्टी–कोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

औद्योगिक रसायनशास्त्र हे देशाच्या जडणघडण आणि विकासामध्ये मूलभूत घटक आहे.पहिली औद्योगिक क्रांती १७६०–१८४० मध्ये टेक्सस्टाईल इंडस्ट्रीमध्ये झाली.त्यामध्ये औद्योगिक रसायनशास्त्राचा महत्त्वाचा वाटा आहे.दुसरी औद्योगिक क्रांती १८७० ते १९१४ मध्ये इंधन,लोहउद्योग मध्ये झाली तर तिसरी १९६० ते २००० मध्ये इलेक्ट्रॉनिक्स अनुसंधान व चौथी क्रांती २०१० ते आतापर्यंत डाटा आर्टिफिशियल इंटेलिजन्स यामध्ये झाली.पहिल्या औद्योगिक क्रांतीमध्ये टेक्स्टाईल साठी औद्योगिक रसायनशास्त्रमार्फत विविध मानवनिर्मित धागे हे महत्त्वपूर्ण होते.दुसऱ्या क्रांतीमध्ये इंधन व लोहनिर्मिती यामध्ये औद्योगिक रसायनशास्त्राचे डिस्टीलेशचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे.प्रा.प्रसाद कावळे यांनी सिप्ला इंडस्ट्रीमधील त्यांचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगताना विद्यार्थ्यांना औद्योगिक रसायनशास्त्र कंपन्यांमध्ये भरपूर संधी आहेत असे सांगितले तसेच या कार्यक्रमात औद्योगिक रसायनशास्त्र मंडळाचा अध्यक्ष म्हणून साळुंखे भक्ती तर सचिव म्हणून करपुडे प्रांजली व विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.आण्णाराव चौगुले यांनी केले तर आभार भक्ती साळुंके या विद्यार्थिनीने मानले.याप्रसंगी डॉ.नंदिनी कोरडे,डॉ.नाथराव केदार,डॉ.रवींद्र शिंदे,डॉ.श्रेयश माहुरकर,प्रा.नवनाथ ढेकणे यांच्यासह इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# विद्यापीठ युवक महोत्सवात दयानंद वाणिज्यचा दबदबा कायम!

## सर्वसाधारण उपविजेतेपद; तब्बल १२ पारितोषिके



**लातूर/प्रतिनिधी** : नांदेडच्या स्वा. रा.ती.म. विद्यापीठाच्या ''ज्ञानतीर्थ'' २०२५ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाचे सर्वसाधारण उपविजेतेपद लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयास प्राप्त झाले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि विष्णुपुरी येथील ग्रामीण टेक्निकल आणि मॅनेजमेंट कॅम्पसच्या संयुक्त विद्यमाने दि.१२ ते १५ ऑक्टोंबर दरम्यान आंतर महाविद्यालयीन ज्ञानतीर्थ युवक महोत्सव घेण्यात आला. सदरील युवक महोत्सवात दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने यशाची उत्तुंग झेप घेत तब्बल १२ पारितोषिकांसह सर्वसाधारण उपविजेतेपद प्राप्त केले. आदिवासी नृत्य (सुवर्ण पदक), रांगोळी (सुवर्ण पदक), वक्तृत्व (सुवर्ण पदक), स्किट/ विडंबन (सुवर्ण पदक), भारतीय समूह गायन (रौप्य पदक),लावणी (रौप्य पदक), पोस्टर पेंटिंग (रौप्य पदक), कलात्मक जुळवणी (रौप्य पदक), उत्कृष्ट एकांकिका (कांस्य पदक),उत्कृष्ट अभिनय पुरुष – गजानन मिश्रा (कांस्य पदक), नक्कल (कांस्य पदक), उत्कृष्ट दिग्दर्शन–सुनील खलुले (कांस्य पदक) अशी तब्बल बारा पारितोषिक प्राप्त करीत आपला दबदबा निर्माण करीत यशाच्या परंपरेत मोलाची भर घातली.

सदरील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण उपस्थित होते. तसेच यावेळी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या प्रा. नवलाजी जाधव, सचिन गोणे, विनायक राठोड, संकेत राजपूत, रोहित जाधव, धनंजय वीर, बापू वीर वैभव ठाकूर, आनंद खलुले, राम सावंत, आकाश कुलकर्णी प्रशिक्षकांचा सन्मान करण्यात आला. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. साईनाथ उमाटे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा अष्टेकर, प्रा. शितल चेरेकर, प्रा. कल्याणी पाटील, प्रा.अजय चव्हाण, प्रा.मेरवान राठोड, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी, प्रा. साक्षी पाटील आदींचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

## वाचन प्रेरणा दिनात कवितांची आतिषबाजी– कवी रमेश चिल्ले यांनी केले विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध



**लातूर/प्रतिनिधी** : डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती अर्थात ''वाचन प्रेरणा दिनानिमित्त'' श्री पूरणमल लाहोटी पाठशाळेत ज्येष्ठ साहित्यिक तथा सुप्रसिद्ध बाल साहित्यिक श्री. रमेश चिल्ले यांच्या मार्गदर्शन व बाल कवितांच्या कार्यक्रमाचे आ २०१८ योजित केले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी तर प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक प्रतिनिधी धनंजय सरपाळे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, त्यांच्या लेखन क्षमतेचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांची अवांतर साहित्याशी मैत्री व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर कवी रमेश चिल्ले यांनी डॉ. ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्राविषयी प्रेरणादायी माहिती सांगितली. त्यानंतर अवांतर वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना विशद करून कवितेच्या प्रेरणा व कविता निर्मितीचे कौशल्यही विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखवले. व शेवटी खोपेगाव , को को कोंबडा , नंदीबैल गावाकडे चला, पेरलेले उगवेल इत्यादी कविता आपल्या खुमासदार शैलीत विद्यार्थ्यांसमोर सादर केल्या. विद्यार्थ्यांनी कवितांना उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन कृतीयुक्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण प्रारिक यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार विशाल तांदळे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भिम दुनगावे, राहुल बोबडे, व्यंकट काकनाळे, बालाजी आचमारे यांनी परिश्रम घेतले.

# २१ व्या शतकातील साहित्यामध्ये समाजवास्तवाचे प्रतिबिंब आवश्यक डॉ. जयद्रथ जाधव

**लातूर/प्रतिनिधी** : भारत शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर संचलित जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालयाच्या मराठी विभाग, इतिहास विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष () आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने ''मराठी २१व्या शतकातील साहित्य : स्वरूप आणि संदर्भ'' तसेच ''इतिहास पर्यटन आणि शाश्वत विकास : संधी आणि आव्हाने'' या विषयांवरील राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या परिषदेच्या समारोप समारंभाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा साहित्य परिषदेचे केंद्रीय कार्यकारी सदस्य डॉ. जयद्रथ जाधव, प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे उपस्थित होते. तसेच परिषदेचे समन्वयक डॉ. प्रमोद चव्हाण, डॉ. केशव आलगुले, मराठी विभागप्रमुख डॉ. धीरजकुमार कोतमे, आणि डॉ. सतीश डांगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. समारोपप्रसंगी बोलताना डॉ. जयद्रथ जाधव म्हणाले की, ''साहित्यिकांची सर्वात मोठी जबाबदारी म्हणजे समाजात घडणाऱ्या घटनांवर सजगपणे भाष्य करणे. दलित, ग्रामीण किंवा स्त्रीवादी साहित्य असोत्यामध्ये समाजातील वास्तवाचे, संघर्षाचे आणि परिवर्तनाचे प्रतिबिंब दिसणे आवश्यक आहे. आज सामाजिक,



राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि कृषी क्षेत्रात अनेक आव्हाने उभी राहत आहेत; त्यावर विचार मांडणारे आणि सकारात्मक मार्ग दाखवणारे साहित्य निर्माण झाले पाहिजे.'' ते पुढे म्हणाले की, ''वास्तववादी आणि संशोधनपर साहित्यामुळे वाचकांमध्ये विचारांची दिशा बदलते, विकासात्मक दृष्टिकोन निर्माण होतो आणि साहित्याचा दर्जाही उंचावतो. साहित्यिकांनी काळाच्या पुढे जाऊन समाजातील बदल टिपले पाहिजेत.'' या प्रसंगी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी वाचनसंस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, ''आजच्या काळात वाचनाकडे वाचकांचा कल कमी होताना दिसतो. उत्कृष्ट वाचनसंस्कृती जोपासल्याने समाजातील संवेदना जागृत होतात आणि साहित्यिकांना नवीन दृष्टिकोन मिळतो.''कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. केशव आलगुले, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. गीता वाघमारे, प्रा. प्रज्ञा कांबळे यांनी मानले.

## फार्मसीच्या विद्यार्थ्यांकरिता ओव्हरव्ह्यू ऑफ फार्माकॉलॉजी या पुस्तकाचे आ. अभिमन्यू पवार यांच्या शुभहस्ते अनावरण

**औसा/प्रतिनिधी** : औसा तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुरज मालपाणी व प्रा. मयुरी चंद्रवंशी लिखित आणि फार्म करिअर पब्लिकेशन निर्मित 'ओव्हरव्ह्यू ऑफ फार्माकॉलॉजी' या पुस्तकाचे अनावरण विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य, आ. अभिमन्यू पवार यांच्या शुभहस्ते करण्यात आले.याप्रसंगी श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे,सहसचिव श्री महादेव खिचडे, प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे,



प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिव, विभाग प्रमुख डॉ. समीर शफी, डॉ. अजय फूगटे, डॉ. सुरज मालपाणी, प्रा. मयुरी चंद्रवंशी, प्रा. विकास मुगळे, शिवशंकर वागदरे, गिरीश भावले इत्यादी उपस्थित होते.संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे तसेच सर्व प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी पुस्तकाचे लेखक व प्रकाशकांचे अभिनंदन व कौतुक केले.यावेळी आ. अभिमन्यू पवार यांनी फार्मसी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले की, अशा वैज्ञानिक पुस्तकांमुळे विद्यार्थ्यांना औषधविज्ञानाचे सखोल ज्ञान मिळण्यास मदत होऊन संशोधनाची आवड निर्माण होईल.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# अ.जा विद्यार्थ्यांच्या प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज निकाली प्रक्रियेस ३१ ऑक्टोबर पर्यंत मुदत समाज कल्याण विभागाचे निर्देश

धाराशिव, (जिमाका) -सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता आदी शिष्यवृत्तींचा लाभ महाडीबीटी ऑनलाईन प्रणालीद्वारे अदा केला जातो.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ व त्यापूर्वीच्या कालावधीतील महाडीबीटी प्रणालीवरील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अनेक अर्ज विद्यार्थी तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने,शैक्षणिक वर्ष २०२४-२५ व त्यापूर्वीच्या कालावधीतील सर्व प्रलंबित अर्ज (विद्यार्थीस्तरावर किंवा महाविद्यालय स्तरावर)३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत पूर्णतः निकाली काढावेत,असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच विहीत मुदतीत अर्ज निकाली न काढल्यास अनुसूचित जाती प्रवर्गातील कोणताही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये,यासाठी महाविद्यालयांनी विशेष दक्षता घेणे आवश्यक आहे.एखादा विद्यार्थी शिष्यवृत्ती लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांवर राहील,याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी,असे आवाहन श्री.सचिन कवले,सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,धाराशिव यांनी केले आहे.

महाडीबीटी प्रणालीवरील प्रलंबित अर्ज वेळेत निकाली काढून अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लाभ मिळावा,यासाठी समाज कल्याण विभागाने सर्व महाविद्यालयांना निर्देश दिले आहे.

# व्हिजेएनटी,ओबीसी व विषेश मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांनी ३० ऑक्टोबरपर्यंत शिष्यवृत्ती अर्ज सादर करावे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे आवाहन

धाराशिव,दि.१६ ऑक्टोबर (जिमाका) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत व्हीजेएनटी, ओबीसी व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता इत्यादी योजनांचा लाभ देण्यात येतो.सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील या सर्व योजनांसाठीचे तात्काळ अर्ज http://mahadbtmahit.gov.in या संकेतस्थळावर ३० ऑक्टोबर २०२५ पर्यंत भरून पाठविणे आवश्यक आहे.

सन २०२४-२५ करिता बहुतांश विद्यार्थ्यांनी महाडीबीटी प्रणालीवर अर्ज भरले आहेत,मात्र हे अर्ज सध्या महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत.संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी अद्यापपर्यंत अर्जांची पडताळणी करून सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाकडे सादर केलेली नाहीत.

तरी,जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांना आवाहन करण्यात येते की,सन २०२४-२५ करिता आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिनवर प्रलंबित असलेले विमुक्त जाती भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विषेश मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे पात्र अर्ज तात्काळ पडताळणी करून मंजुरीसाठी या कार्यालयाकडे सादर करावेत.

अर्ज सादर करताना शाळा सोडल्याचा दाखला (T.C.) आणि गुणपत्रक ही मूळ प्रती (ORIGINAL) असावीत,याची दक्षता घ्यावी.तसेच ज्या अर्जांमध्ये त्रुटी असतील,त्यांची त्रुटीपुर्तता करूनच अर्ज मंजुरीसाठी सादर करावेत.

आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिनवर एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही, याची काळजी घ्यावी.तसेच ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत,अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी महाविद्यालय स्तरावरून तात्काळ सूचित करावे,असे आवाहन श्री.अमोल ताकभाते,सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण,धाराशिव यांनी केले आहे.

# माहितीचा अधिकार दिन : जिल्हाधिकारी कार्यालयात उत्साहात साजरा; कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन व जनजागृती

धाराशिव, (जिमाका) दरवर्षी २८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय माहितीचा अधिकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो.माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा देशभरात लागू करण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर २९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे माहितीचा अधिकार दिन साजरा करण्यात आला.

प्रास्ताविक उपजिल्हाधिकारी श्रीमती स्वाती शेंडे यांनी केले.प्रास्ताविकातून माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयात येणारे माहिती अधिकार अर्ज व अपील अर्ज यांच्या संदर्भात सर्व कर्मचारी यांनी विहित वेळेत अर्जदारास माहिती पुरविण्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच,अर्जांवरील कार्यवाही ठरलेल्या मुदतीत केली जाते किंवा नाही याबाबत संबंधित जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. माहिती अधिकार अधिनियम २००५ ची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी सर्व कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी वेळेत निपटारा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

या प्रसंगी तहसीलदार (सर्वसाधारण) श्री.प्रकाश व्हटकर यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.त्यांनी माहिती अधिकाराबाबत समाजात जनजागृती वाढविण्यासाठी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास विहित मुदतीत देणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. तसेच माहिती अधिकार प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शनही कर्मचाऱ्यांना करण्यात आले.

कार्यक्रमास नायब तहसीलदार श्रीमती कांचन जाधव,नायब तहसीलदार (महसूल) श्री.एम.डी.बेजगमवार,नायब तहसीलदार (आस्थापना) श्री.संतोष पाटील,तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील सहायक महसूल अधिकारी व महसूल सहाय्यक उपस्थित होते.

# भूम येथे गाव बाल संरक्षण समिती सदस्यांचे क्षमता बांधणी प्रशिक्षण संपन्न

धाराशिव, (जिमाका) -महिला व बाल विकास विभागांतर्गत महात्मा गांधी प्रशासन प्रशिक्षण संस्था आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने भूम येथे ग्राम बाल संरक्षण समिती सदस्यांसाठी तालुकास्तरीय क्षमता बांधणी प्रशिक्षण नुकतेच आयोजित करण्यात आले.

या प्रशिक्षणासाठी विधी व परिविक्षा अधिकारी जे.व्ही.भाले,क्षेत्रीय कार्यकर्ता जे.आर.पाटील,केस वर्कर ए.डी.काळे,समुपदेशक व्ही. आर. कांबळे हे प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते.तसेच प्रकल्प अधिकारी श्रीमती बोराडे,परिविक्षा अधिकारी आश्विनी इंगळे,इंदुमती महाले व श्रीमती मोटे उपस्थित होत्या.

प्रशिक्षणात भूम प्रकल्पातील सुमारे १८० अंगणवाडी सेविका सहभागी झाल्या.गाव बाल संरक्षण समितीची रचना,कार्य,उद्दिष्टे तसेच बालकांचे हक्क,संरक्षण आणि जनजागृती याविषयी माहिती देण्यात आली. गावातील बालकांच्या समस्या ओळखून त्यांचे निराकरण स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासकीय योजनांद्वारे करण्याचे मार्गदर्शनही करण्यात आले.

सुधारित मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत बाल न्याय अधिनियम २०१५,बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६,महिला संरक्षण अधिनियम २००५ यांसह जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे कामकाज, प्रायोजकत्व योजना,बालसंगोपन योजना,महिला समुपदेशन कक्ष,वन्स स्टॉप सेंटर,बाल न्याय मंडळ आणि चाइल्ड लाइन यांची सविस्तर माहिती सहभागी सदस्यांना देण्यात आली.

# श्री तुळजाभवानी देवींच्या सिंहासन पूजेची नोव्हेंबर महिन्याची ऑनलाईन नोंदणी सुरू



धाराशिव दि १६ ऑक्टोबर (जिमाका) महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या सिंहासन पूजेची नोव्हेंबर - २०२५ मधील नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करण्यात येते.भाविकांनी अधिकृत संकेतस्थळावरून आपली नोंदणी करावी. असे आवाहन मंदिर संस्थानने केले आहे.

महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश,कर्नाटक, तेलंगणा आणि इतर राज्यांमधून मोठ्या संख्येने भाविक कुलाचार व कुलधर्मासाठी तुळजापूरला येतात. श्री तुळजाभवानी देवीची सिंहासन पूजा ही अत्यंत श्रद्धेने केली जाणारी पूजा असून,तिच्या नोंदणीसाठी http://shrituljabhavani.org या अधिकृत संकेतस्थळावर 'सिंहासन पूजा पास बुकिंग' या मेन्यूवर क्लिक करून, https://shrituljabhavanimataseva.org या लिंकवर जाऊन नोंदणी करता येईल.

नोंदणीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.नोंदणी कालावधी : २० ऑक्टोबर २०२५ सकाळी १० वाजता ते २५ ऑक्टोबर सकाळी १० वाजेपर्यंत. प्रथम सोडतीचे ऑनलाईन पेमेंट : २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता एसएमएसद्वारे कळविण्यात येईल.प्रथम फेरीचे ऑनलाईन पेमेंट २७ ऑक्टोबर सकाळी ११ ते २८ सप्टेंबर सकाळी १० वाजेपर्यंत राहील.

सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास ऑनलाईन ड्रॉ पध्दतीने व्दितीय सोडत व भाविकांना पेमेंटसाठी एसएमएस पाठविणे : २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता.व्दितीय फेरीचे ऑनलाईन पेमेंट : २८ ऑक्टोबर सकाळी ११ ते २९ ऑक्टोबर सकाळी १० वाजेपर्यंत. तृतीय सोडत २९ मे रोजी सकाळी ११ वाजता.तृतीय फेरीचे ऑनलाईन पेमेंट : २९ ऑक्टोबर सकाळी ११ ते ३० ऑक्टोबर सकाळी १० वाजेपर्यंत.अंतीम यादी प्रसिद्धी : ३० ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहणार आहे.

सर्व भाविक भक्त,महंत,पुजारी, सेवेकरी आणि नागरिकांनी वरीलप्रमाणे सिंहासन पूजेच्या नोंदणीची माहिती लक्षात घेऊन वेळेत नोंदणी करावी,असे आवाहन श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) यांनी केले आहे.

# 'रक्तामृत इन हिमोफिलिया' संशोधन प्रकल्पाचे दुसरे राज्यस्तरीय शिबीर यशस्वी: जिल्ह्यातून महाराष्ट्राला नवा आरोग्यदायी आदर्श

धाराशिव, (जिमाका) -शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,धाराशिव येथे रक्तामृत इन हिमोफिलिया संशोधन व विकास विभागाचे दुसरे राज्यस्तरीय शिबीर यशस्वीपणे पार पडले.या शिबिराचे मुख्य प्रायोजक क्लीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी लिमिटेड, पुणे असून,लॅब टेस्टचे प्रायोजकत्व इंटास फाउंडेशन यांनी स्वीकारले.

या शिबिराचे आयोजन अगदतंत्र विभागाच्या माध्यमातून डॉ.शीतल कोपार्डे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. राज्यातून आलेल्या ९५ हिमोफिलिया रुग्ण बांधवांनी शिबिरात सहभाग घेतला व प्रकल्पाच्या विविध सेवांचा लाभ घेतला.

शिबिराचे उदघाटन खासदार श्री. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ.वीणा पाटील,अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,धाराशिव उपस्थित होत्या.मंचावर डॉ.एन.एस. गंगासागरे (प्रकल्प मार्गदर्शक),डॉ. शीतल कोपार्डे (सह-मार्गदर्शक),श्री.सुरज माळी (इंटास फाउंडेशन),डॉ.अभिजीत मुंशी (क्लिनिकल ट्रायल एक्स्पर्ट),डॉ.पूजा आचार्य व डॉ.महिमा (वेलनेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी) तसेच डॉ.मनोज बाबर (निवासी वैद्यकीय अधिकारी) हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.एन.एस. गंगासागरे यांनी केले,तर प्रधान संशोधक डॉ. शुभम रामनारायण धूत यांनी रक्तामृत इन हिमोफिलिया संशोधन प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार,या औषधोपचारामुळे रुग्णांच्या फॅक्टरची आवश्यकता लक्षणीयरीत्या कमी झाली असून,आर्थिक बचत व जीवनमानात उल्लेखनीय सुधारणा दिसून येत आहे.

आपल्या भाषणात खासदार श्री. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी हा रक्तामृत संशोधन प्रकल्प धाराशिव जिल्ह्याचा अभिमान असून 'धाराशिव पॅटर्न' संपूर्ण जगासाठी आशेचा किरण ठरेल. असे सांगितले.

अधिष्ठाता डॉ.वीणा पाटील यांनी संस्थेच्या वतीने या प्रकल्पाला पूर्ण सहकार्य राहील असे सांगत,अधिकाधिक रुग्णांपर्यंत हा उपक्रम पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत,असे नमूद केले.

शिबिरात सहभागी दोन रुग्णांनी आपली मनोगत व्यक्त केले.एका रुग्णाने सांगितले की,पूर्वी वारंवार ब्लीडिंग होत असे,परंतु रक्तामृत औषध घेतल्यानंतर ती वारंवारता कमी झाली आहे आणि आता मी नियमित कामावर जातो. दुसऱ्या रुग्णाने भावनिक शब्दांत म्हटले की,या प्रकल्पामुळे आम्हाला नवजीवन मिळाले आहे.फॅक्टरवरील अवलंबित्व कमी झाले असून आत्मविश्वास वाढला आहे.

शिबिरात रुग्णांना निःशुल्क सुविधा पुरविण्यात आल्या.यामध्ये हिमोफिलियाविषयक सल्ला व मार्गदर्शन,Factor Assay, Inhibitor, Prothrombin Time d aPTT तपासण्या,रक्तामृत वटी औषधाचा संपूर्ण कोर्सबाबत माहिती,वेलनेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीमार्फत फिजिओथेरपी सल्ला देण्यात आला.

रुग्णांसाठी राहण्याची,जेवणाची, चहा-अल्पोपहाराची तसेच रिक्षा वाहतुकीची सोय आयोजकांकडून करण्यात आली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.दौलत निपाणीकर यांनी केले,तर आभार प्रदर्शन डॉ.शीतल कोपार्डे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय,धाराशिव येथील सर्व शिक्षकवर्ग,अधिकारी,कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

रक्तामृत इन हिमोफिलिया हा उपक्रम जिल्ह्यातून संपूर्ण महाराष्ट्रासाठी प्रेरणादायी ठरत असून,आयुर्वेदाच्या माध्यमातून हिमोफिलियाच्या उपचाराला नवा वैज्ञानिक दृष्टिकोन मिळत आहे.

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न:५१ रक्तदात्यांचा सहभाग,दाम्पत्याने शतक पूर्ण करून दिला प्रेरणादायी संदेश

धाराशिव (जिमाका)- शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,धाराशिव आणि शासकीय रक्तपेढी,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिराचे सहआयोजक म्हणून आयुर्वेद व्यासपीठ धाराशिव,निमा धाराशिव आणि निमा वुमन फोरम धाराशिव यांनी सहभाग नोंदविला.

शिबिराचे उदघाटन अधिष्ठाता डॉ. वीणा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.या रक्तदान शिबिरात एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांमध्ये महाविद्यालयातील अध्यापक,पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थी,कर्मचारी,तसेच निमा आयुर्वेद व्यासपीठ संघटनेचे पदाधिकारी,कर्मचारी आणि त्यांचे नातेवाईक सहभागी झाले होते.

शिबिराच्या उदघाटन कार्यक्रमास आयुर्वेद व्यासपीठ देवगिरी प्रांताचे अध्यक्ष डॉ.प्रशांत कोथळकर, आयुर्वेद व्यासपीठ धाराशिव अध्यक्ष डॉ.पल्लवी कोथळकर,निमा धाराशिव अध्यक्ष ॲड.डॉ.पंकज शिंगारे आणि निमा वुमन फोरमतर्फे डॉ.पाटील हे अतिथी म्हणून उपस्थित होते.

आयुर्वेद व्यासपीठ धाराशिवतर्फे रक्तदात्यांना खर्जुरादी मंथ देण्यात आला,तर निमा धाराशिव आणि निमा वुमन फोरम धाराशिव यांच्या वतीने चहा व बिस्किटांची व्यवस्था करण्यात आली होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.तृप्ती सरोदे यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व रक्तदान शिबिरामागील उद्देश याविषयी माहिती डॉ.सचिन टिके यांनी दिली,तर आभार डॉ.मयूर देशमुख यांनी मानले.

धाराशिव शहरातील डॉ.प्रशांत कोथळकर यांनी या शिबिरात त्यांचे ७३ वे रक्तदान केले,तर त्यांच्या पत्नी डॉ. पल्लवी कोथळकर यांनी २७ वे रक्तदान केले.या दांपत्याने मिळून एकत्रितपणे रक्तदानाचे शतक पूर्ण करून प्रेरणादायी उदाहरण घालून दिले.

या यशस्वी शिबिराच्या आयोजनासाठी पंचकर्म विभागातील डॉ.सचिन टिके,डॉ. श्रीराम रगड, डॉ.अनुराधा पाटील,डॉ. दीपाली इंगळे,तसेच रोगनिदान विभागातील डॉ.मयूर देशमुख,डॉ.तृप्ती सरोदे, डॉ.समता गालफाडे,मेट्रन कांचन पाटील व त्यांचा नर्सिंग स्टाफ आणि निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज बाबर यांनी परिश्रम घेतले.

तसेच द्रव्यगुण विभागातील डॉ.प्राची खैरे यांनी अतिथी स्वागतासाठी तुळस रोपांची भेटवस्तू सादर करून स्वागताची सुंदर व्यवस्था केली.

रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनामुळे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,धाराशिव येथे समाजसेवेचा व मानवतेचा एक प्रेरणादायी संदेश दिला गेला.

# १६ ऑक्टोंबर रोजी कायदा-नियम भंग प्रकरणी 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१६ ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २२४ कारवाया करुन १,९०,९०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**

**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथेप्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649